मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » बुधवार, ९ एप्रिल २०२५ » वर्षः ६ » अंक:१११ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकुण रू.३

## सूर्य आणखी तळपणार

**नागपूर,दि. ८ प्रतिनिधी**

राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भातील शहरांमध्ये केली जात असून गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने तापमानाचे नवे उच्चांक गाठले जात आहेत. पारा सातत्याने वाढतच चालल्यामुळे वाढत्या उन्हात नागरिकांची होरपळ होत आहे. दरम्यान, प्रादेशिक हवामान खात्याने येत्या दोन दिवसात उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा दिला आहे. विदर्भात सध्या सरासरीच्या चार अंश सेल्सिअसपर्यंत पेक्षा जास्त तापमान आहे. विदर्भातील सर्वच शहरांमधील तापमान ४० अंश सेल्सिअसपलीकडे पोहोचले आहे. आता बुधवारी, नऊ एप्रिलला आणि गुरुवारी दहा एप्रिलला विदर्भातील अकोला, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर या जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यातील अनेक भागात कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे.

### अग्राग्रलेख
### खरीखरी

## चीनने थोपटले दंड

आज जगात अमेरिकेनंतर चीन हाच शक्तिशाली देश आहे. हे आता आपण माहिती करून घेतले पाहिजे. गेल्या तीन-चार दशकात कम्युनिस्ट राजवट असतानाही चीनच्या राज्यकर्त्यांचे भांडवलदारी व्यवस्थे प्रमाणे वागणे आता जगाला प्रभावित करीत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जग लोकशाहीवादी अमेरिका आणि तुकड्या तुकड्यांमध्ये पसरलेला सोवियत संघ यांच्यात विभाजित झाला होता. या दोन देशांच्या किंवा विचारसरणीच्या मध्ये जे काही अलिप्ततावादी देश होते. त्यांचे नेतृत्व भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, झेकोस्लावियाचे मार्शल टिटो आणि इजिप्तचे नासिर हे करत होते. हे गटनिरपेक्ष देश अमेरिका आणि सोवियत संघ दोघांच्याही सत्ता संघर्षामध्ये सहभागी नव्हते. अमेरिकेच्या गोटात पाकिस्तानसह अनेक देश होते. सोवियत संघासोबत ज्या ज्या देशात साम्यवादी आहेत, असे लोक उभे होते. 1990 मध्ये सोवियत संघाचा अवतार संपला. सोवियत संघाने आपले अस्तित्व आता जवळजवळ संपणार आहे. हे मान्य केले. त्यानंतर हळूहळू पोलादी पडद्याआडचा चीन प्रकट झाला आणि पद्धतशीरपणे माओच्या निधनानंतर चीनने कम्युनिस्ट साम्यवादी आवरणाखाली भांडवलशाही व्यवसाय सुरू केले. सध्या जरी चीन एवढा प्रभावी वाटत नसला. तरी तो बराच पुढे गेलेला आहे. हे सर्व जग मान्य करते. अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री किसिंजर यांनी चीन बरोबर बोलणी करून चीनचे महत्त्व जाणले होते. आता या कालखंडात चीन सोवियत संघाचा प्रमुख असलेल्या रशियापेक्षा कितीतरी पुढे गेलेला आहे. सोवियत संघातील आपल्या प्रदेशाचा वेगळा देश या दाव्यावर युक्रेन सोबत लढता लढता रशियाची शक्ती क्षीण होऊ लागली आहे. हे उघड उघड दिसले. आता अशा परिस्थितीमध्ये ट्रम्प आले आणि त्यांनी त्यांना वाटेल त्या प्रकाराने आपले घोडे पुढे दामटले. आता अमेरिकेने जसे आयात शुल्क धोरण राबवले. तोच प्रकार चीनही करणार आहे. त्याची झलक आणि चिन्हे चीनने दाखवूनच दिलेली आहेत. तुम्ही दरवाढ कराल. तर आम्हीही दरवाढ करू शकतो. असा साधा हिशेब आहे. अमेरिकेची दादागिरी जगावर प्रभाव टाकते हे मान्यच आहे. पण या अमेरिकेवर प्रचंड मोठे कर्जही आहे. ही कटू वस्तुस्थिती आहे. या सर्वांमध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या मानाने चीन कर्जमुक्त देश आहे. उलट लहानसहान देशांवर सावकारी व्याज लावून चीन अनेक देशांना आपल्या पंज्याखाली आणण्याचा प्रयत्न करीत आहे. या युद्धात भारत सध्या तरी कुठे दिसत नाही. अजूनही भारताने सध्या तरी नेहरूकालीन अलिप्ततेचे धोरण स्वीकारलेले दिसते. काल आपला शेअर बाजार चांगलाच आपटला. पण पुन्हा तोट्याची भरपाई करण्यात थोडेफार यश मिळालेले आहे. ही भरपाई पूर्णता होऊ शकत नाही. हे खरे असले तरी पुन्हा घसरण झाली नाही, हे महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत शांततावादी जगाला चीन आणि अमेरिका हे दोन्ही देश वेठीस धरत आहेत. असेच दिसत आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात सरकारच आरोपी आहे - प्रकाश आंबेडकर



**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

पोलीस कोठडीत संशयास्पदरित्या मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाची पहिली सुनावणी मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात पार पडली. या प्रकरणी आता प्रकाश आंबेडकर यांची सनसनाटी प्रतिक्रिया समोर आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतीची विटंबना झाल्यानंतर परभणीत हिंसाचार उसळला होता. यानंतर पोलिसांनी काहीजणांना अटक केली होती. यापैकी सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला होता. पोलिसांच्या मारहाणीमुळे सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्याचा आरोप झाला होता. मात्र, राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनाकडून हे सर्व आरोप फेटाळण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर सोमनाथच्या मृत्यूप्रकरणात दोषी पोलिसांवर कारवाई व्हावी, यासाठी सोमनाथ यांच्या आईने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर आज पहिली सुनावणी पार पडली असून यावेळी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईच्या बाजूने वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी स्वत: युक्तिवाद केला. त्यानंतर माध्यमांना याबाबत माहिती दिली.

"आज न्यायालयाने कस्टोडियन डेथ च्या संदर्भात मॅजिस्ट्रेटने चौकशी करावी अशीच तरतूद आहे. मात्र त्यांच्या निर्णयानंतर कुणी आणि कसा निर्णय घ्यायचा? पुढची चौकशी कशी करायची? यासंदर्भातला कायदा अपुरा आहे. त्यामुळे आम्ही न्यायालयाला सांगितलं की सोमनाथ सूर्यवंशी न्यायालयीन कोठडीत असताना त्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पुढील कारवाई असेंब्ली किंवा पार्लमेंट करत नाही तोपर्यंत पुढची कारवाई कशी झाली पाहिजे याच्या गाईडलाईन्स कोर्टाने दिल्या पाहिजे. या प्रकरणी पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी होणार आहे. या प्रकरणात आम्ही विशेष तपास समिती नेमावी अशीही मागणी आम्ही केली आहे. ही एसआयटी सरकार नाही तर न्यायालय नेमेल. कोर्टाच्या अंतर्गतच ही समिती असेल. ही मागणी मान्य होईल का? हे पाहणं आता महत्त्वाचे ठरेल. सरकारबाबत त्यांनी नोटीस काढली आहे." असं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

यानंतर प्रकाश आंबेडकर म्हणाले, "बदलापूरच्या प्रकरणातला मृत्यू हा देखील कस्टोडियन डेथचा प्रकार आहे. मात्र आई वडिलांनी याचिका मागे घेतली आहे. न्यायालयाने माणूस उभा केला आहे त्यांच्या मार्फत कोर्ट हे प्रकरण चालवतं आहे. त्या प्रकरणात काही कमतरता आहेत त्या या प्रकरणात आम्ही पूर्ण करु. या प्रकरणात राज्य शासनच आरोपी आहे. त्यामुळे चौकशी कशी होते आहे त्याचा नमुना आम्ही न्यायालयाला दाखवला. त्याआधारे आम्ही असं म्हटलं आहे की गाईडलाईन कोर्टाने द्याव्यात. आम्ही न्यायालयाकडे न्याय मागण्यासाठी आलो आहोत. मागील चार वर्षात ८७६ प्रकरणं अशी झाली आहेत. त्यापैकी कनव्हिक्शन कमी आहेत. कोर्टासमोर हेच सांगितलं सरकारच या प्रकरणात आरोपी आहे. त्यामुळे सरकारकडून आम्ही किंवा न्यायालयाने अपेक्षा ठेवणं आवश्यक नाही. यासंदर्भात माझी आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली होती त्यांना मी सांगितलं होतं की कायदा अपूर्ण आहे तो पूर्ण केल्यानंतर या प्रकरणी चौकशी होणार नाही अशी परिस्थिती आहे. तसंच सीआयडीला आरोपी म्हणून या प्रकरणात आणलं जाईल" असंही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारचे ९ मोठे निर्णय



**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. राज्यात एम सँड म्हणजे कृत्रिम वाळूबाबत धोरण आणण्यात येणार असून त्यावर पुढच्या कॅबिनेटमध्ये चर्चा केली जाणार आहे. यातच सिंधी समाजाविषयीही एक निर्णय घेतला आहे. सिंधी समाजाने आतापर्यंत सरकारकडे अनेक मागण्या केलेल्या आहेत. आता सरकारने याच मागण्यापैकी एका मागणीकडे गांभीर्याने लक्ष घातले आहे. सरकारने सिंधी विस्थापितांसाठी अभय योजना आणली आहे. या योजनेअंतर्गत सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी विशेष धोरण राबवले जाईल.

राज्यातील मोठ्या प्रकल्पातील वाळू उपसा करण्यात येणार आहे आणि त्या प्रकल्पांची क्षमता वाढवण्यात येणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आला आहे. तसचे सरकारने आता फाळणीनंतर विस्थापित झालेल्या सिंधी समाजाकडे असलेली घरे आणि आस्थापना नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. यातील काही निर्णयांबाबत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली.

१) नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार, यातून विकास कामांना वेग येणार. (नगर विकास)

२) राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर. (महसूल)

३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार. (गृहनिर्माण)

४) वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा C&DA मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय. (गृहनिर्माण)

५) सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण विशेष अभय योजना-२०२५ (महसूल)

६) नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार. (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)

७) खाजगी अनुदानित आयुर्वेद व खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधील गट-ब, क व ड संवर्गातील शासन मंजूर पदावरील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णय (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

८) शासकीय आयुर्वेद/ होमिओपॅथी/युनानी/योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पद्धतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित. (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

९) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा. (ग्रामविकास)

## मी परत कोकण पादाक्रांत करणार - उद्धव ठाकरे



**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

उबाठा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोकणात पुन्हा राजकीय आक्रमण करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. "मी परत कोकण पादाक्रांत करणार," असे ठाम विधान त्यांनी आज मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी आयोजित एका कार्यक्रमात केले. या प्रसंगी कोकणातील काँग्रेस नेते सहदेव बेटकर यांनी उद्धव ठाकरे गटात प्रवेश केला. उद्धव ठाकरे यांनी स्वतः सहदेव बेटकर यांना शिवबंधन बांधून त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी बोलताना ठाकरे यांनी कोकणातील राजकीय वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्याची घोषणा केली.

या कार्यक्रमात शिवसेना नेते संजय राऊत यांचा उल्लेख करत ठाकरे म्हणाले, "संजय, तुम्ही म्हणालात की कोकणात एक पाऊल टाका. पण मी कोकणात फक्त एक पाऊल टाकणार नाही, तर संपूर्ण कोकण पादाक्रांत करणार. आता बघूया, कोण माझ्या मध्ये येतंय!" त्यांनी गत लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये कोकणातील अनपेक्षित निकालांचा उल्लेख करत विजयाच्या 'सूरस कथा' बाहेर येत असल्याचे सांगितले. "ज्यांनी थापा मारल्या, ते आता हात वर करून मोकळे झाले आहेत. पण राज्यातील जनतेला शिवसेनेची गरज आहे. दिलेल्या शब्दाला जागणारा एकमेव पक्ष म्हणजे शिवसेना," असेही ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी या प्रसंगी महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय घडामोडी, आगामी निवडणुका आणि राज्यातील परिस्थितीवरही भाष्य केले. त्यांनी विशेषतः कोकण विभागावर लक्ष केंद्रित करत आपल्या पक्षाच्या नव्या राजकीय मोहिमेचे संकेत दिले. "मी परत कोकण पादाक्रांत करणार," या त्यांच्या विधानातून कोकणात पुन्हा सक्रिय राजकीय पुनरागमनाचा इरादा स्पष्ट होतो.

यावेळी त्यांनी सत्ताधारी महायुती सरकारवरही जोरदार टीका केली. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांच्या अभावासारख्या मुद्द्यांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. "महाराष्ट्रातील जनतेच्या समस्या सोडवण्यात सरकार अपयशी ठरलं आहे. जनतेच्या हितासाठी शिवसेना कायम आघाडीवर असेल," असे ते म्हणाले.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही ठाकरे यांनी पक्षाच्या रणनीतीबाबत संकेत दिले. त्यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले आणि विरोधकांना थेट आव्हान देण्याची तयारी दर्शवली. "शिवसेना हा जनतेचा पक्ष आहे आणि जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही," असे सांगत त्यांनी आपला आत्मविश्वास व्यक्त केला.

कोकणातील राजकीय समीकरणे बदलण्याच्या उद्देशाने उद्धव ठाकरे यांनी सुरू केलेली ही मोहीम आगामी काळात राज्याच्या राजकारणात काय परिणाम घडवून आणते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## लाडकी बहीण योजनेचा एप्रिलचा हप्ता अक्षय्य तृतीयेला

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत एप्रिल महिन्याचा हप्ता लाभार्थ्यांना ३० एप्रिल २०२५ रोजी मिळणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. हा हप्ता अक्षय्य तृतीया या सणाच्या शुभ मुहूर्तावर वितरित होणार असून, यामुळे राज्यातील कोट्यवधी महिलांना आर्थिक आधार मिळणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात.

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. "लाडकी बहीण योजनेचा हप्ता नियमितपणे वितरित करण्याचे सरकारचे धोरण आहे. एप्रिल महिन्याचा हप्ता अक्षय्य तृतीयेच्या शुभदिनी म्हणजेच ३० एप्रिलला जमा होईल," असे त्यांनी सांगितले. या योजनेमुळे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना मिळत असून, त्यांच्या आरोग्य आणि पोषणासाठीही हातभार लागत आहे.

या योजनेसाठी आतापर्यंत २.५२ कोटी महिलांनी नोंदणी केली असून, जानेवारी आणि फेब्रुवारीचे हप्तेही मार्च महिन्यात वितरित झाले होते. एप्रिलचा हप्ता वेळेवर मिळावा यासाठी प्रशासनाने बँकांशी समन्वय साधला आहे. लाभार्थ्यांना हा हप्ता त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरित केला जाईल.

अक्षय्य तृतीया हा सण संपन्नतेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे या दिवशी हप्ता जमा होणे, हे लाभार्थ्यांसाठी आनंदाचे आणि शुभेच्छांचे कारण ठरणार आहे. "हा निर्णय महिलांना सणासुदीच्या काळात आर्थिक मदत देण्यासाठी घेण्यात आला आहे," असे एका अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, या योजनेच्या यशामुळे सरकारने पुढील काळात हप्ता २,१०० रुपये करण्याचे संकेतही दिले आहेत, परंतु त्यावर अंतिम निर्णय बाकी आहे. लाभार्थ्यांनी आपली बँक खाती तपासून घ्यावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## कुणाल कामरा प्रकरण - हायकोर्टाने बजावली मुंबई पोलिसासह आमदारांना नोटीस

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकमनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत म्हटलं होतं. या प्रकरणी दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्याची मागणी कामराने मुंबई उच्च न्यायालयाकडे केली होती. या प्रकरणी न्यायालयाने आज (दि.८) मुंबई पोलिस आणि गुन्हा दाखल केलेल्या शिवसेना आमदाराला 'उत्तर द्या' नोटीस बाजवली असून, पुढील सुनावणी १६ एप्रिल रोजी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.



कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकमनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत म्हटलं होतं. उपमुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा 'गद्दार' असा उल्लेख केला होता. यावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले होते. शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कामराविरोधात गुन्हा दाखल झाला होता. कामराने न्यायालयाकडे गुन्हा रद्द करण्याची मागणी केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि एस.एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. पोलिस आणि तक्रारदार आमदार पटेल यांना सूचना घेऊन याचिकेवर उत्तर देण्याचे निर्देश खंडपीठाने दिले. या प्रकरणात पुढील सुनावणी आता बुधवार १६ एप्रिल २०२५ रोजी होणार असल्याचे न्यायालयाने निश्चित केले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबनात्मक गाण्यावरून स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कामराविरोधात खार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. कामरा याला अनेक वेळा चौकशीसाठी समन्स देखील बजावले होते. त्याने चौकशीसाठी हजर राहणे टाळले. यानंतर त्याने दाखल झालेला गुन्हा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर बुधवार १६ एप्रिल रोजी पुढील सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

### कामराचे २०२१ पासून तामिळनाडूमध्ये वास्तव्य

तीन समन्स बजावल्यानंतरही पोलिसांसमोर हजर न झालेल्या या कॉमेडियन कुणाल कामरा याने ५ एप्रिल रोजी एफआयआर रद्द करण्याची मागणी करत याचिका दाखल केली होती. कामरा यांचे वकील, ज्येष्ठ वकील नवरोज सेर्वाई यांनी न्यायालयाला माहिती दिली की, कॉमेडियन कामराने त्यांच्या जीवाला आणि सुरक्षिततेला धोका असल्याचे कारण देत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तपासात सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. कामरा त्यांच्या याचिकेत म्हटल्याप्रमाणे २०२१ पासून तामिळनाडूमध्ये राहत आहे.

कामराच्या याचिकेत नमूद केलेल्या युक्तिवादात म्हटले आहे की, त्याचे विधान राजकीय घटनांवर, विशेषतः शिवसेनेतील फूट आणि २०२२ मध्ये उद्धव ठाकरेंविरुद्ध शिंदे यांनी केलेल्या बंडाच्या संदर्भात केले गेले होते. त्यामुळे त्याच्याविरोधीत दाखल केलेला एफआयआर (FIR) हा त्याच्या मूलभूत अधिकारांचे विशेषतः भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे आणि जीवन आणि स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. कामराच्या कायदेशीर टीमने "हा गंभीर गुन्हा नाही, तर विनोदी सादरीकरणातून उद्भवलेला गुन्हा आहे. त्यामुळे कामरावर चौकशी सुरू ठेवणे हे त्याच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे गंभीर उल्लंघन ठरेल, जे स्वातंत्र्य भारतीय संविधानानुसार संरक्षित आहे, असेही म्हटलं आहे.

## मराठी वि. हिंदीची धग इंग्रजीपर्यंत जाऊन पोहोचली

### डोंबिवलीत वाद, तरुणींना मारहाण

**डोंबिवली, दि. ८ प्रतिनिधी**

डोंबिवली पश्चिमेतील जुनी डोंबिवली भागात मंगळवारी सकाळी एक महिला आपल्या सोसायटीच्या आवारात दुचाकी घेऊन जात होती. सोसायटीच्या प्रवेशव्दारावर एक तरूण उभा होता. त्याला महिलेने एक्सक्युज मी म्हणत त्या तरूणाला सोसायटी प्रवेशव्दारातून बाजुला होण्याची विनंती केली. त्या तरूणाने काही क्षणात मागे फिरून मराठीतून बोला, असे म्हणत दुचाकीवरील महिलांना धमकावले.

मराठीतून बोला असा आग्रह तरूणाने धरला. त्यावेळी दुचाकीवर एक महिला दुचाकी चालवित होती. दुसरी महिला तिच्या पाठीमागे दुचाकीवर एक नऊ महिन्याचे बाळ घेऊन बसली होती. मराठीतून बोलत नाही म्हटल्यावर तरूणाने दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या महिलेचा हात पिरगटुन तिला मराठी कशी बोलत नाहीस, असा प्रश्न केला. हा प्रकार सोसायटीच्या प्रवेशव्दारात सुरू होता.

आव्हान देणाऱ्या तरूणाचे घर सोसायटीच्या तळमजल्याला होते. त्यावेळी त्या तरूणाच्या घरातील कुटुंबीय यामध्ये चार ते पाच महिला आणि तीन तरूणांनी मराठी भाषेतून बोलत नाहीत म्हणून दोन्ही महिलांना सोसायटी आवारात बेदम मारहाण केली. यावेळी एका महिलेच्या कडेवर बाळ होते. या मारहाणीत त्या बाळाची आबाळ झाली. याची पर्वा मारहाण करणाऱ्यांनी केली नाही.

एक्सक्युज मी हा नेहमीच्या वापरातील शब्द आहे. त्यामुळे तो बोलला म्हणजे मराठी भाषेचा अपमान होत नाही. असे असताना किरकोळ कारण पुढे करून आम्ही दोन्ही महिलांना सात जणांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी आम्ही विष्णुनगर पोलीस ठाण्यात सात जणांविरुध्द तक्रार केली आहे. पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे, असे तक्रारदार महिलेने सांगितले.

## ट्रम्प 'टॅरिफ'विरोधात आता आरपारची लढाई : चीनचा अमेरिकेला इशारा



**बीजिंग, दि. ८ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी चीन आणि भारतासह जगातील १८० देशांवर परस्पर शुल्क लादण्याची घोषणा केली होती. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे जागतिक बाजारात अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकेला प्रत्युत्तर देत जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या चीनने प्रत्युत्तरात्मक शुल्कही जाहीर केले आहे. यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चिनी आयातीवर ५०% अतिरिक्त कर लादण्याची धमकी दिल्यानंतर चीनने आज 'टॅरिफ'विरोधातील लढाई यापुढे आरपारची असेल, असा इशारा दिला आहे.

चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे की, अमेरिकेने चीनवर लादलेला कथित वाढीव कर हा पूर्णपणे निराधार आणि एकतर्फी गुंडगिरीचा प्रकार आहे. चीनने उचललेले प्रतिउपाय त्याचे सार्वभौमत्व, सुरक्षा आणि विकास हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी आणि सामान्य आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्था राखण्यासाठी आहेत. ते पूर्णपणे वैध आहेत.

"चीनवरील आयात करात वाढ केल्यानंतर अमेरिकेची धमकी ही चुकीनंतरची आणखी एक चूक आहे. पुन्हा एकदा अमेरिकेच्या ब्लॅकमेलिंग स्वभावाचा पर्दाफाश करते. चीन हे कधीही स्वीकारणार नाही. जर अमेरिकेने आपल्याला त्याच्या मार्गावर जाण्यास भाग पाडले तर चीन शेवटपर्यंत त्याच्याशी लढेल," असे त्यात म्हटले आहे.

अमेरिकेने टॅरिफ दर वाढवले तर चीन आपले हक्क आणि हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी प्रत्युत्तरात्मक उपाययोजना करेल. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे की ते अमेरिकेशी चर्चा करू इच्छितात. व्यापार युद्धात कोणीही विजेते नसतात, असेही वाणिज्य मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी नमूद केले आहे.

अमेरिकेबद्दल चीनची भूमिका खूप कडक आहे. चीन कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेच्या दबावापुढे झुकणार नाही, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान म्हणाले की, अमेरिका आंतरराष्ट्रीय नियमांना बगल देत आहे.

## आमचा पक्ष राहावा की नाही हे आता भय्ये ठरवणार का?

### सुप्रीम कोर्टातील याचिकेवर मनसे आक्रमक

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्यानंतर आता मनसे पक्ष आक्रमक झाला आहे. राज ठाकरे हे उत्तर भारतीय लोकांविरोधातील हिंसेला पाठिंबा देत आहेत. त्यामुळे राज ठाकरेंवर गुन्हा दाखल करावा. तसेच मनसे पक्षाची मान्यता रद्द करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. यावरून आता मनसे नेते संदीप देशपांडे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

मुंबईतील उत्तर भारतीय विकास सेना या पक्षाचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी राज ठाकरे आणि मनसेच्या विरोधात सर्वोच न्यायालयात याचिका दाखल केली आहे. RSS, बजरंग दलात ९० टक्के कार्यकर्ते हे उत्तर भारतीय आहेत याचा आम्हाला गर्व आहे. त्यांचे वडील, काका, मोठे भाऊ, आजोबा ड्युटीवर आहेत ते तिथे सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करतात. त्यांच्या कानफाडीत तुम्ही मारताय. उद्या तुम्हाला या लोकांनी मदत केली पाहिजे हे कसले राजकारण. आम्ही तुमचा विरोध करतो, सर्वोच्च न्यायालयातून तुमच्याविरोधात आदेश आणणारच. सनातनी हिंदू पक्ष म्हणून आम्ही सर्वांना एकत्रित करून तुमच्याविरोधात उभे करणार, असा इशारा सुनील शुक्ला यांनी दिला आहे. यानंतर आता संदीप देशपांडे यांनी संताप व्यक्त केला आहे.



कुठला तरी भैय्या म्हणे कोर्टात गेला आहे की, मनसेची मान्यता रद्द करावी. मराठी माणसाचा पक्ष बंद व्हावा म्हणून भय्ये प्रयत्न करणार असतील तर भय्यांना मुंबईत, महाराष्ट्रात राहू द्यायचे का यावर विचार करावा लागेल, अशी पोस्ट संदीप देशपांडे यांनी एक्सवर केली आहे. तसेच मीडियाशी बोलताना संदीप देशपांडे म्हणाले की, आमचा पक्ष राहावा की राहू नये हे आता भय्ये ठरवणार का? त्या याचिकेमागील षड्यंत्र तुम्ही लक्षात घ्या. हे सगळे प्रादेशिक पक्षांना संपवण्याचे षड्यंत्र आहे. हे भाजपाचे षड्यंत्र आहे. हे लोक भाजपाचेच पिट्टू आहेत. भाजपावाले यांच्या माध्यमातून आमच्या पक्षाला नख लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र आम्ही अशा गोष्टींना घाबरत नाही. आम्हाला कोणी संपवण्याचा प्रयत्न केला तर त्या लोकांना इथे ठेवायचे की नाही याचाही आम्हाला विचार करावा लागेल, असे संदीप देशपांडे यांनी सांगितले.

दरम्यान, मराठी न बोलणाऱ्या इतर भाषिक लोकांविरुद्ध द्वेषपूर्ण भाषण दिल्याबद्दल राज ठाकरे यांच्यावर कारवाई करावी आणि मनसेची मान्यता रद्द करावी, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेत करण्यात आली आहे. ३० मार्च २०२५ रोजी राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याच्या सभेत केलेल्या भाषणाचा उल्लेखही या याचिकेत करण्यात आला आहे. मॉल आणि बँका अशा सार्वजनिक ठिकाणी काम करणाऱ्या अमराठी भाषिकांवर हल्ले केले जात आहेत, असेही या याचिकेत म्हटले गेले आहे.

## माजी क्रिकेटपटू केदार जाधवची राजकारणात नवी इनिंग, भाजपमध्ये केला प्रवेश



**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

टीम इंडिया आणि आयपीएलचे मैदान गाजवल्यानंतर माजी क्रिकेटपटू केदार जाधव राजकारणात सक्रीय झाला आहे. क्रिकेटच्या मैदानातून निवृत्त झाल्यानंतर केदारने समालोचकाची भूमिका पार पाडली होती. त्यानंतर आता तो राजकारणाच्या खेळपट्टीवर बॅटिंग करताना दिसणार आहे. केदार जाधवने आज भाजपामध्ये पक्षप्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत केदार जाधवने भाजपाच्या मुंबईतील कार्यालयात पक्षप्रवेश केला. राजकीय कार्यासाठी भाजपाचीच निवड का केली, याबाबत त्यांनी पक्षप्रवेशानंतर सांगितले.

रविंद्र चव्हाण यांनी भाजपाचे भगवे उपरणे केदार जाधवच्या गळ्यात घालून पक्षप्रवेश झाल्याचे सांगितले. त्यानंतर केदारने उपस्थितांशी संवाद साधला. तो म्हणाला, "सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांना नमस्कार करतो. देशात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने जे विकासाचे राजकारण सुरु ठेवले आहे, त्यात मलाही खारीचा वाटा उचलायचा आहे. याच उद्देशाने मी आज भाजपात प्रवेश केला आहे. तुम्हा सर्वांचा मला पाठिंबा असेल याची खात्री आहे. पक्षासाठी जे करायला सांगतील ते करण्याची माझी तयारी असेल."

केदार जाधवने नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली होती. त्यानंतर त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि भाजप नेते आशिष शेलारांशीही संवाद साधला होता. त्यावेळेपासूनच केदारच्या भाजपा प्रवेशाची चर्चा रंगली होती. केदार जाधव हा राजकारणात प्रवेश करणारा पहिला खेळाडू नाही. या आधी भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन, माजी सलामीवीर गौतम गंभीर, पश्चिम बंगालचा क्रीडामंत्री मनोज तिवारी या खेळाडूंनीही क्रिकेटनंतर राजकारणाच्या पिचवर फलंदाजी केली आहे. त्यांच्यापाठोपाठ आज केदार जाधवनेही राजकीय पक्षप्रवेश केला. टीम इंडियातून खेळलेला मराठमोळा केदार जाधव हा मूळचा पुण्याचा आहे. टीम इंडियाकडून त्याने ७३ वनडे सामन्यात १३०० हून जास्त धावा केल्या आहेत.

## महत्त्वाचे

### सप्तश्रृंगगडावर भाविक भक्तांची मांदियाळी

**सप्तश्रृंग गड ।** चैत्र शुद्ध ९ अर्थात राम नवमीच्या दिवशी चैत्रोत्सवास प्रारंभ झाला. एकामागून एक पालख्या, दिंड्या या सोबतच



भाविकांचे लहान मोठे समूह गडावर पोहचत आहे. डफ, डीजेच्या आवाजाने गड परिसर दणाणून सोडला आहे. श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट व गोदामृत बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्था, नाशिक यांच्या माध्यामातुन सेवाभावी वारकरी परिवार महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यामानाने आयोजित अखंड हरीनाम सप्ताह व विशेष आकर्षण म्हणून देवीचा जगराता कार्यक्रम भाविकांसाठी विशेष पर्वणी ठरत आहे. एकूण गडावर अतिशय भक्तिमय वातावरणात सप्तश्रृंगी मातेचा चैत्रोत्सव पार पडत आहे. श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त ॲड. ललित निकम यांनी परिवारासमवेत देवी पंचामृत महापूजा केली. यादरम्यान विश्वस्त संस्थेच्या कार्यालयातून देवीच्या आभूषणांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विश्वस्त संस्थेचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहा. व्यवस्थापक तथा कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, इस्टेट कस्टोडियन प्रकाश पगार, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, मुरलीधर गावित, मंदिर पर्यवेक्षक सुनील कासार, भक्तनिवास पर्यवेक्षक प्रशांत निकम आदींसह कर्मचारी उपस्थित होते. आज श्री भगवतीस हिरव्या रंगाचे भरजरीचे महावस्त्र नेसविण्यात आले. यासह सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचे गाठले, सोन्याची मोहनमाळ, सोन्याचा मयूरहार, सोन्याची वज्रटिक, सोन्याचे पाऊल, सोन्याचे कर्णफुले, सोन्याची नथ, चांदीचा मुकुट, चांदीचा कमरपट्टा ही आभूषणे परिधान करण्यात आलेली आहेत. विश्वस्त संस्थेच्या माध्यमातून गडावर येणाऱ्या भाविकांना टोलनाका, रोपवे परिसर, शिवालय व रिंगरोड परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कार्यान्वित करण्यात आलेली आहे. यासह विश्वस्त संस्थेच्या अन्नपूर्णा प्रसादालयात मोफत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. पायी प्रवास करून येणाऱ्या भाविकांसाठी विश्वस्त संस्थेच्या माध्यमातून निवारा शेड उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यासह हरिपाठ, कीर्तन, भजन आणि भक्तीपर कार्यक्रमामुळे भाविकांमध्ये एक वेगळा उत्साह निर्माण होत आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध ठिकाणी फिरते आरोग्य पथक कार्यरत आहे. मंदिराच्या पायऱ्यामध्ये ठिकठिकाणी वैद्यकीय टीम कार्यरत आहे. शिवालय परिसरात स्वच्छतागृह उभारण्यात आलेले आहे.

### एक जग शांतीसाठी... एकत्र एक मंत्र

**नाशिक ।** येथील जितो संघटनेच्या नाशिक शाखेच्यावतीने बुधवार (दि.९ एप्रिल) विश्व नवकार महामंत्र दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून "एक मंत्र शांतीसाठी एकत्र एक मंत्र" उपक्रम साजरा केला जाणार आहे. जीतो आणि प्रतिष्ठित वैश्विक संस्थांच्या सहयोगाने दिनांक 9 एप्रिल 2025 ला विश्वस्तरावर विश्व नवकार मंत्र दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. मंत्र जपासाठी सकाळी सात ते दहा वाजेपर्यंत ठक्कर डोम येथे हा कार्यक्रम होणार आहे. त्यासाठी सर्व जैन बांधवांनी आपली उपस्थिती लावावी, असे आवाहन जितो संघटनेतर्फे करण्यात आले आहे. ठक्कर डोमला जाण्यासाठी स्वर्गीय श्रीमान राजमलजी चोरडिया मातोश्री ट्रॅव्हल्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. बससेवा सकाळी ६.३० वाजता सर्व ठिकाणांवरून उपलब्ध करून देण्यात आली आहे. सगळ्यांना आग्रहाचे आमंत्रण.

### जिल्हा युवा पुरस्कारासाठी २१ एप्रिलपर्यंत अर्ज करावेत

**नाशिक ।** युवा वर्गातील युवक व युवतींनी केलेल्या कामाचा गौरव करून त्यांना प्रोत्सहित करण्यासाठी राज्याच्या नवीन युवा धोरणानुसार राज्य व जिल्हा पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत. 2023-24 व 2024-25 वर्षासाठीच्या पुरस्कारांसाठी 21 एप्रिल 2025 पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक येथे सकाळी 11 ते सायंकाळी 5 या वेळेत सादर करावेत, असे जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी कळविले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी नाशिक यांच्याद्वारे पुरस्काराचे 1 मे 2025 रोजी वितरण होणार आहे. त्या अनुषंगाने पुरस्कारासाठी www.maharashtra.gov.in या संकेतांकावरील शासन निर्णयात शेवटी विहित नमुना अर्ज उपलब्ध आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

## १ कोटी २३ लाख ८५ हजाराचा मुद्देमाल जप्त; विभागीय भरारी पथकाची कामगिरी

**नाशिक ।** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विभागीय भरारी पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दमदार कामगिरी करीतमहाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला विदेशी मद्यसाठा, वाहने, मोबाईल असा १ कोटी २३ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय आयुक्त उषा वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय भरारी पथकाने ही कारवाई केली. मुंबई-आग्रा महामार्गावर हिंदुस्थान पेट्रोल पंपाजवळ, बोरोली फाटा, सांगवी शिवार, ता. शिरपूर, जिल्हा धुळे



येथे सापळा रचून कारवाई केली. यावेळी पथकाने महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी प्रतिबंधीत असलेला विदेशी मद्याचा साठा तसेच हा मद्यसाठा घेऊन जाणारा कंटेनर आणि ट्रक जप्त केला. पथकाने आयशर कंटेनर (क्रमांक एम.पी. ०९ जी.जी. ३८०७) आणि टाटा ट्रक (दहा चाकी) (क्रमांक एच. पी. - २८ डी - ५३१२) आणि एक मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई केली. यावेळी वाहनचालक रामराज जयराम वंजारी (३९, रा. सांगवी, ता. शिरपूर, जि. धुळे) याच्यावर गुन्हा दाखल केला ते एक जण फरार झाला.

विभागीय भरारी पथकामध्ये निरीक्षक पी.एम. गौडा, दुय्यम निरीक्षक किरण धिंदळे, पी.आर. मंडलिक, डी. बी. कोळपे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक किरण गांगुर्डे, जवान युवराज रतवेकर, धनराज पवार, महेश सातपुते, राहुल पवार, विलास कुवर, सुनीता महाजन, मुकेश निंबेकर, विजेंद्र चव्हाण, सागर पवार, संदीप देशमुख यांनीही कारवाई केली.

## डॉ. गणेश लोहार यांनी सायकलवर केली नर्मदा परिक्रमा

**नाशिक ।** डॉ. गणेश लोहार यांनी सायकलवर नर्मदा परिक्रमा पूर्ण केली आहे. डॉ. लोहार यांच्या नावावर सायकलिंगमधील पाच रेकॉर्डस आहेत. अनेक प्रकारचे पुरस्कार ज्यांना मिळालेले आहेत.

महानगरपालिकेत पदवीधर शिक्षक असलेले असे विक्रमवीर डॉ. गणेश लोहार यांनी फक्त चैत्र महिन्यात करण्यात येणारी उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा सायकलिंग मोहिम केली. ही परिक्रमा तीनवेळा केली तर संपूर्ण परिक्रमेचे फळ मिळते, असे नर्मदा पुराण व मार्कंडेय पुराणात म्हटले आहे. "कृण्वन्तो विश्वम् आर्यम्" ही टॅगलाईन व भारतीय संस्कृती, योग, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रचार आणि प्रसार करणे, हा त्यांच्या सायकलिंग मोहिमेचा उद्देश असतो. गुढीपाडव्याच्या दिवशी काळाराम मंदिर येथून रामाचे दर्शन घेऊन मोहिमेला सकाळी ६ वाजता सुरुवात झाली. नाशिक मार्गे सापुतारा, वघई, वाजदा, नेत्रंग, राजपिपला, रामपूर असा अत्यंत कठीण व सर्वाधिक घाट असलेला मार्ग त्यांनी निवडलेला होता. पहिला मुक्काम त्यांनी उनई येथे केला. दुसऱ्या दिवशी रात्री ९ वाजता ते रामपूरा येथे पोहचले. उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा त्यांनी सकाळी पायी रामपुरा येथून सुरुवात केली. संपूर्ण मौनात त्यांनी तीन वेळा ही २१ किमीची परिक्रमा केली. परिक्रमा झाल्यानंतर त्यांनी सायकलीने त्या परिसरातील सर्व आश्रमांना त्यांनी भेटी दिल्या, तेथील महंतांना भेटून कार्यपद्धती जाणून घेतली. साधना व गोसेवा हेच बहुतांशी आश्रमांचे ध्येय दिसून आले. "आपकी आस्था, हमारी व्यवस्था" अशाप्रकारचे गुजरात शासनाचे बॅनर्स, त्यांनी केलेली व्यवस्था वाखाणण्याजोगी होती. संपूर्ण परिक्रमा मार्गावर उजेडाची व्यवस्था, जागोजागी औषधोपचार केंद्र, स्वयंसेवी संस्थेच्या वतीने करण्यात आलेली पाणी, नाश्ता, जेवणाची व्यवस्था, नर्मदा मैय्या ओलांडण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेला पूल, दोन्ही तटांवर परिक्रमावाशीयांसाठी उभारण्यात आलेले भले मोठे मंडप, सुरक्षेसाठी जागोजागी पोलिस यंत्रणा, NDRF ची टीम, आंघोळीसाठी शॉवरची व्यवस्था (या परिसरात मगर खूप आहेत. म्हणून नदीवर काही अनुचित प्रकार घडू नये व सर्वांना स्नान ही करता यावे, हा हेतू) स्वच्छता, टापटीप इ. सर्व गोष्टीचा अत्यंत सूक्ष्म योजना शासनाने केलेली आढळली. महत्त्वाकांक्षा असेल तर काय होऊ शकते? ह्याचे प्रत्यक्ष दर्शन झाले. "राजा कालस्य कारणं " ह्याची प्रचिती आली. परतीच्या प्रवास त्यांनी सायकलीने सुरू केला. काळाराम मंदिरात रामाचे दर्शन घेऊन श्रीरामाला संकल्पपूर्तीचे रिपोर्टिंग करून दोन दिवसात नाशिकमध्ये परत आले. दररोज साधारणतः १६० ते १७५ किमी सायकलिंग त्यांनी केली. त्यांच्या सायकलिंग जीवनातील पहिल्यांदाच सर्वाधिक १६०५ मीटर इलेव्हेशन क्लाइंब ही त्यांनी या सायकलिंग मोहिमेत मिळविला, असे त्यांनी सांगितले.



### रद्दी विक्रीसाठी निविदा सादर करण्याचे आवाहन

**नाशिक ।** सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक या कार्यालयातील कालबाह्य कागदपत्रे व रद्दी विक्री करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी आपल्या निविदा बंद पाकिटात प्रति किलोप्रमाणेचे दर दि. 15 एप्रिल, 2025 रोजी सकाळी 11 वाजेपर्यंत प्रादेशिक कार्यालय, रामकृष्ण परमहंस मार्ग, टपाल पेटी क्रमांक 456, नाशिक-2 कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन सहसंचालक अनिल गावित यांनी केले आहे.

सदर विक्री करावयाची रद्दी सुटीचे दिवस वगळून 11 एप्रिल 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत बघता येईल. वेळेनंतर प्राप्त निविदांचा विचार करण्यात येणार नाही. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा 15 एप्रिल 2025 रोजी दुपारी 2 वाजता उघडण्यात येतील.

## दुधारे स्पोर्ट्स फाऊंडेशनतर्फे बीज संकलन, क्रीडा साहित्य वाटप






**नाशिक ।** पिंपळणारे, तालुका दिडोरी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये मंगळवारी (दि. ८) बीज संकलन आणि क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले. निसर्गाचे संवर्धन व्हावे, जनमानसात निसर्गसंवर्धन विषयी जास्तीत जास्त जागरूकता निर्माण व्हावी हा या उपक्रमा मागील हेतू असून, दुधारे स्पोर्ट्स फाऊंडेशनच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे होते. पिंपळणारे, येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या झाडांच्या बी गोळा केल्या आहेत. या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना शाबासकी देण्यासाठी त्यांना प्रमाणपत्र आणि खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी वन विभाग, दिंडोरीचे वन अधिकारी अशोक काळे, पिंपळणारेचे सरपंच छगन कंडाळे, शालेय समितीचे अध्यक्ष अमोल खांडवे, या कार्यक्रमाचे आयोजक अशोक दुधारे, आनंद खरे, अविनाश ढोली, अशोक कदम, दिपक पाटील, सौ.विजया दुधारे, अस्मिता मोगल, दिपक निकम, ज्योती निकम आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक वाल्मीक अहिरे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी वन विभाग अधिकारी अशोक काळे, अशोक दुधारे, आनंद खरे, सरपंच छगन कडाळे यांनी बी संकलानाबद्दल विद्यार्थी आणि शिक्षक यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना आणखी प्रोत्साहन मिळावे यासाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच दोर उडी आणि बिस्कीट वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक वाल्मीक अहिरे, शिक्षक सुनंदा निकम, मनीषा पाटील, कल्पना गांगुर्डे, रोहिणी सोनार, प्रमिला जाधव यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

### उन्हाळी गर्दींच्या पार्श्वभूमीवर विशेष मेमू गाड्यांना मुदतवाढ

**देवळाली कॅम्प ।** उन्हाळी सुट्यां मुळे रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी पाहता रेल्वे प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी बडनेरा- नाशिक- बडनेरा विशेष मेमू गाड्यांच्या कालावधीत वाढ करण्यात आली आहे. तसेच गाडीच्या वेळा पत्रकातही काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

गाडी क्र. 01211 (बडनेरा ते नाशिक) आणि गाडी क्र. 01212 (नाशिक ते बडनेरा) या विशेष मेमू गाड्यांना ३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.



नवीन वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे: बडनेरा- सकाळी 10.05, मूर्तिजापूर- सकाळी 10.30, बोरगाव- सकाळी 10.48, अकोला- सकाळी 11.02, शेगाव- सकाळी 11.33, नांदुरा- दुपारी 12.03 मलकापूर- दुपारी 12.38, बोदवड- दुपारी 1.37, भुसावळ- दुपारी 3.00, जळगाव- दुपारी 3.35, पाचोरा- दुपारी 4.05 चाळीसगाव- दुपारी 4.38, नांदगाव- दुपारी 5.20, मनमाड- दुपारी 5.50, लासलगाव- संध्याकाळी 6.05, निफाड- संध्याकाळी 6.25, नाशिक- रात्री 7.05. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार असून, गर्दीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. उन्हाळी प्रवास करणाऱ्यांनी या बदललेल्या वेळांची नोंद ठेवून नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासना कडून करण्यातआले आहे.

# देवीचा जयघोष करीत हजारो भाविक सप्तश्रृंगी गडाकडे रवाना

## पिंपळनेरात ठिकठिकाणी स्वागत, महाप्रसादाचे आयोजन...

**पिंपळनेर ।** "बोल अंबे की जय... सप्तश्रृंगी माता की जय... ' डोंगर हिरवा गार माय तुना डोंगर ' यांसह विविध गाण्यांच्या तालावर थरिकणारे भक्तांचे पाय आणि वणीच्या देवीचा जयघोष करीत पदयात्रा करीत निघालेले हजारो भाविक असे चित्र साडेतीन शक्तिपीठांपैकी आद्यशक्तीपीठ असलेल्या वणीच्या सप्तश्रृंगी देवीच्या चैत्र यात्रोत्सवाला जाण्यासाठी निघालेल्या भाविकांमुळे पिंपळनेरहुन गडाकडे जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर पाहायला मिळत आहे. गेल्या दोन दिवसांपासून गडाच्या दिशेने चालणाऱ्या भाविक-भक्तांनी संपुर्ण पिंपळनेर-सटाणा रस्ता फुलून गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.सालाबादप्रमाणे चैत्र पौर्णिमेला होणाऱ्या यात्रेसाठी नंदुरबार,धुळे, शिरपूर, जळगाव जिल्ह्यासह गुजरात व मध्यप्रदेश राज्यातील हजारो भाविक वणीच्या दिशेने रवाना होतात.हे भाविक पिंपळनेर शहरात दाखल झाल्यानंतर त्यांचे अनेक मंडळांकडून जोरदार स्वागत



करण्यात आले.तर तीव्र उन्हातही भाविक मिळेल तिथे विश्रांती घेत मोठ्या श्रद्धेने मार्गस्थ होत आहेत. शहरात दाखल झालेल्या भाविकांचे जथ्थेच्या-जथ्थे गडाच्या दिशेने निघाल्याने भक्ती आणि श्रद्धेचे अनोखे रूप पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे या भाविकांना महाप्रसाद, पाणी, औषधी, निवारा, चहा- नाश्ता,शरबत मोफत देण्यासाठी अनेक मंडळ,स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामस्थांनी सोई सुविधा केल्याने पायी पदयात्रा करणाऱ्या भाविकांचा प्रवास काहीअंशी सुखकर होण्यास मदत झाली आहे. ठिकठिकाणी मंडप टाकलेले असून त्या ठिकाणी भोजन व विश्रांतीची सोय केली आहे.तर मोफत पाणी, शरबत आदी पेय उपलब्ध करून दिल्याने भाविकांना उन्हापासून दिलासा मिळाला आहे. पायी अंतर चालतांना या भाविकांमध्ये लहान मुलांसह,आबालवृध्द, महिला सहभागी झालेले पाहायला मिळाले. गडाकडे जाणाऱ्या पालख्या, भाविक-भक्त यांना बघण्यासाठी नागरिक रस्त्यांवर गर्दी करीत आहेत.

## महत्त्वाचे

### रिपाइंच्या देवळाली शहराध्यक्षपदी राजाभाऊ जाधव यांची नियुक्ती



**देवळाली कॅम्प ।** आयुष्यभर पांढरा कुर्ता, निळी टोपी आणि करकर वाजणाऱ्या कोल्हापुरी चप्पलांतून नगरा-नगरात आणि वस्त्यावस्तीत फिरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा पोहचवणारे दिवंगत पॅन्थर मोहन जाधव यांनी आंबेडकरी चळवळीत मोलाचे योगदान दिले. स्वतःची बर्फाची फॅक्टरी असतानाही, ते इंडियन आर्मीमध्ये ठेकेदार म्हणूनही कार्यरत होते. चळवळीत स्वतःला झोकून देताना त्यांनी कधीही कुटुंबाची पर्वा केली नाही. त्यांच्या निधनानंतर जाधव कुटुंबाने मोठ्या संघर्षांना तोंड दिले. त्यांच्या पत्नीने अनेक अडचणींवर मात करत आपल्या सात मुलांना मोठं केलं. मोहन जाधव यांचे थोरले चिरंजीव दिवंगत गौतम जाधव देखील आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत एक निष्ठावान पॅन्थर म्हणून चळवळीत सक्रिय होते. त्यांच्या अपघाती निधनानंतर तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री तथा सद्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी जाधव कुटुंबाला भेट देत मदतीचा हात पुढे केला. मात्र, त्यांच्या शिवाय इतर कुठल्याही पुढाऱ्याने जाधव कुटुंबाची विचारपूस केली नाही. या पार्श्वभूमीवर, जाधव कुटुंबाचा त्याग आणि चळवळीतील योगदान ओळखून, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A) चे महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. संतोष कटारे यांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केले. जाधव कुटुंबाने आंबेडकरी चळवळीसाठी जीवनभर त्याग केला, स्वतःच्या अडचणीं पेक्षा समाज हिताला प्राधान्य दिलं. वडिलोपार्जित कार्य पुढे नेताना अनेक संकटांचा सामना करत त्यांनी चळवळीची ज्योत अखंड तेवत ठेवली. या सर्व गोष्टीचा विचार करून खऱ्या अर्थाने जाधव परिवाराला न्याय देण्याचे काम जर कोणी केले असेल तर ते म्हणजे सर्व धर्म समभाव जोपासणारे, लोकनेते, डॅशिंग, न्यायप्रिय उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे यांनी आपले सुपुत्र भूषण लोंढे यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यात यांच्या प्रमुख उपस्थितीत राजाभाऊ जाधव यांना "देवळाली शहराध्यक्ष" पदावर नियुक्त करण्यात आले. या नियुक्ती पत्राच्या माध्यमातून पक्षाने जाधव कुटुंबाच्या योगदानाला मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे पक्षाच्या शहरातील कामकाजाला नवसंजीवनी मिळेल, चळवळ अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### मविप्र रुग्णालयातर्फे विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन

**नाशिक ।** इंडियन रेड क्रॉस सोसायटी, नाशिक जिल्हा शाखा, नाशिक सायकलिस्टस् फाउंडेशन आणि मविप्रचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त दि. ७ ते १२ एप्रिलदरम्यान आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या बुधवार दि. ९ एप्रिल रोजी मविप्रचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय यांच्या सौजन्याने सकाळी १० ते १ या वेळेत रेडक्रॉस भवन, टिळकपथ, रविवार कारंजा, नाशिक येथे मोफत अस्थिरोगनिदान, फिजिओथेरपी आणि शल्यचिकित्सा (जनरल सर्जरी) शिबिर होणार आहे. येथे डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, नाशिकचे अस्थिरोगतज्ज्ञ, सर्जन्स आणि फिजिओथेरपिस्ट रुग्णांची विनामूल्य तपासणी करणार आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून विनामूल्य अथवा सवलतीच्या दरांत उपचार केले जाणार आहेत. गरजूंनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### शेतकऱ्याची लेक झाली न्यायाधीश

**नाशिक ।** एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील कु. शिवानी रामनाथ फडोळ या मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विधी महाविद्यालयातील




विद्यार्थिनीने कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर दिवाणी न्यायाधीश परीक्षेत गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक पटकावला आहे. याबद्दल मविप्र पदाधिकारी, संचालक मंडळ, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व शिक्षणाधिकारी आणि शिक्षकांनी शिवानीचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सन २०२२ च्या दिवाणी न्यायाधीश व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत नाशिकची कु. शिवानी रामनाथ फडोळ हिने गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक मिळविला आहे. शिवानीने मविप्रच्या मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयातून शालेय शिक्षण घेतले असून, मविप्रच्याच विधी महाविद्यालयातून सन २०१६-२०२१ या दरम्यान शिक्षण घेतले आहे. एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील लेकीने मिळविलेले हे देदीप्यमान यश असून निकालाबाबत सर्वांनी आनंद व्यक्त केला आहे. मविप्र विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या गडाख यांच्या हस्ते महाविद्यालयात तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. निरंतर कठोर परिश्रम घेण्याची तयारी आणि ध्येय ठेवल्यास यश मिळविणे अवघड नाही, असे यावेळी शिवानी फडोळहिने सांगितले.

# त्र्यंबकमधील वाढत्या अतिक्रमणाची खुद्द मंत्र्यानीच केली पोलखोल

## त्रंबक नगरपरिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष; अहिल्या तलावात बेकायदेशीर बांधकाम





**नाशिक ।** त्र्यंबकमध्ये वाढत्या अतिक्रमणाला नगर परिषदचे अधिकारीच जबाबदार असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, अधिकाऱ्यांच्या बेपर्वाईचा गैरफायदा काही व्हाईटकॉलर भूमाफियांनी घेतला आहे. अधिकाऱ्यांच्या बेरोजगारपणाचा बुरखा दस्तूरखुद्द मंत्री गिरीष महाजन यांनीच फोडला असून, काही पाकीटबाज अधिकाऱ्यांच्या धृतराष्ट्रीय भूमिकेमुळे एका भूमाफीयाने थेट अहिल्या तलावातच बांधकाम केल्याचे धक्कादायक वास्तव सिंहस्थ कुंभमेळ्याचे पहाणी दौऱ्यात उघडकीस आले आहे. या धक्कादायक प्रकाराबाबत नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी श्रीया देवचक्के यांना मंत्री गिरीश महाजन यांनी विचारणा केली असता याबाबत मंत्र्यांकडून अचानक प्रश्नांची सरबत्ती सुरू झाल्याने मुख्याधिकारी देवचक्के यांची अक्षरशः भंबेरी उडाल्याचे दिसून आले. या पाहणी दौऱ्यात मठाधिपती हरीगिरी महाराज, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा हे उपस्थित होते. आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने मंत्री गिरीश महाजन यांनी त्र्यंबक येथे पाहणी दौरा केला असता त्यांची नजर अहिल्या तलावातील बेकायदेशीर बांधकामाकडे गेली असता त्यांनी या ठिकाणी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

नगरपरिषद अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे त्र्यंबक शहरात वारेमाप अतिक्रमण वाढले असून, यावर कुणाचेही नियंत्रण नसल्याने त्र्यंबकेश्वर मध्ये सध्या चाललेय तरी काय? असावा उपस्थित केला जात आहे. त्र्यंबकमधील वाढत्या अतिक्रमणामुळे सध्या चिंता व्यक्त केली जात असून, कुंभमेळ्याच्या दृष्टीने अतिक्रमणाचा मुद्दा डोकेदुखी ठरण्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कुंभमेळासाठी महत्त्वाच्या असलेला अहिल्या तलावात एका भूमाफियाने नगर परिषदेची कुठलीही परवानगी न घेता बेकायदेशीर बांधकाम केल्याने या भूमाफियावर त्रंबक मधील काही प्रतिष्ठित व्यक्तींचा वरदहस्त असल्याचे बोलले जाते. बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या व्यक्तीचे देखील उच्चपदस्थांची घनिष्ठ संबंध असल्यामुळे नगर परिषदेने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे बोलले जाते. त्यातही या कामासंदर्भात तात्पुरत्या स्वरूपाची कारवाई करून काही दिवसात सदरचे बांधकाम पुनः पूर्ववत करण्यात येण्याची शंका उपस्थित केली जात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई होईल का? असाही सवाल उपस्थित केला जात आहे तर जिल्हाधिकारी जलज शर्मा व विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम हे याबाबत काय भूमिका घेतात याकडेही सर्वांचे लक्ष लागून आहे.

> सदरचे बांधकाम हे अहिल्या तलावात करण्यात आलेले दिसून आले आहे. या बांधकामाबाबत नगर परिषदेची कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही.
>
> – **स्वप्निल काकड,** अभियंता बांधकाम विभाग, नगरपरिषद त्रंबक

# पिंपळनेरमध्ये श्रीराम जन्मोत्सवानिमित्त शहरातून काढण्यात आली भव्य शोभायात्रा



**पिंपळनेर ।** येथे भगवान श्री राम नवमी निमित्ताने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासून राम नगर येथे स्थित असलेल्या श्रीराम मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. सकाळी पूजा, आरती, भजन, कीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. तर, सायंकाळी ६.३० वाजता विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आदींच्या उपस्थितीत रामनगर येथून भव्य-दिव्य शोभायात्रा काढण्यात आली.

मिरवणुकी दरम्यान प्रभू श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान यांचे पात्र असलेला रथावरील सजीव देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. शहरातील रामनगर, इंदिरा नगर, संजय नगर, समोडे चौफुली, बस स्थानक, पंचमुखी कॉर्नर, गोपाळ नगर, नाना चौक, बाजार पेठ, विश्वनाथ चौक या प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.लहान बालकांपासून अवघी तरुणाई श्री रामाच्या गीतांवर नाचत होती. हातात भगवे झेंडे व भगवी टोपी घालून सर्वांनी शोभायात्रेत सहभाग नोंदवला. महिलांची संख्याही लक्षणीय होती.तर संपूर्ण शहर भगवेमय झाल्याचे दिसून आले.पांझरा नदीवरील पुलाच्या दुतर्फा भगवे झेंडे लावण्यात आले होते तसेच विविध मंडळांकडून फटाक्यांची आतिषबाजी करीत रथाचे व शोभायात्रेचे जोरदार स्वागत करण्यात आले.

श्रीरामाचा जयघोष करत पिंपळनेरकर युवक बँडच्या तालावर हातात भगवे झेंडे घेऊन श्री रामाच्या जयघोषाने नाचण्यात मग्न झाले होते. मिरवणुकी दरम्यान पिंपळनेर पोलिस प्रशासनाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे, पोलीस उपनिरीक्षक विजय चौरे, भूषण शेवाळे यांसह कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# महात्मा फुलेंचे जीवनचरित्र रुपेरी पडद्यावर झळकणार

## 'फुले' चित्रपटाच्या निर्मिते, दिग्दर्शकांनी घेतली भुजबळांची भेट



**नाशिक ।** मुंबई येथे महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित "फुले" या चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी भेट घेतली.

प्रत्येक चित्रपट तयार होताना सिनेमॅटिक लिबर्टी प्रत्येक दिग्दर्शक घेत असतो; मात्र या चित्रपटात वस्तुस्थिती दाखवण्यात आली आहे. अनेक पुस्तकांचा आणि विविध उपलब्ध साधनांचा अभ्यास करूनच हा चित्रपट बनविण्यात आला असल्याचे मत चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी व्यक्त केले. दिग्दर्शक अनंत महादेवन, निर्माते अनुया चौहान कुडेचा, निर्माते रितेश कुडेचा आणि सहनिर्माते रोहन गोडांबे यांनी घेतली छगन भुजबळ यांची भेट घेऊन चर्चा केली. लवकरच हा चित्रपट रुपरी पडद्यावर दिसणार आहे.

> महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित हिंदी मध्ये हा चित्रपट येत आहे. त्यावर दिग्दर्शक आणि बाकी मंडळींनी बरीच मेहनत घेतल्याचे दिसते. आहे त्यामुळे हा चित्रपट सर्वांनी पाहिलाच पाहिजे महात्मा फुलेंचं कार्य हे देशभर नाही तर जगभर आपण पोहोचवलं पाहिजे.
>
> – **छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री**

# चितेगाव परिसरात आढळले दुर्मिळ पण दिसण्यात साधर्म्य असलेले दोन साप


## एक विषारी तर दुसरा बिनविषारी । ए.आर.इ.ए.एस. संस्थेचे संचालक व सदस्यांची कामगिरी..

**(सुशांत रणशूर यांजकडून )**

**ओझर ।** अंत्यत दुर्मिळ असणारे पण सारखेच दिसणारे दोन वेगवेगळ्या जातींचे साप निफाड तालुक्यातील चितेगांव व दारणासांगवी या गावाच्या परिसरात वर्षात दोन-तीन वेळेस सर्प रक्षकाकडून पकडण्यात आले आहेत.

द्राक्षे व कांदा पिकांमुळे निफाड तालुका हा महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया म्हणून ओळखला जातो; पण या तालुक्यात वेगवेगळी पिकेदेखील आता घेतली जात आहेत. पिकांना जसे पोषक वातावरण तालुक्यात आहे तसेच सजीव सृष्टीच्या वाढीसाठीदेखील पोषक वातावरण निफाड तालुक्यात आहे. ऊस, द्राक्ष बागा, मका अशा मोठया पिकांमध्ये बिबट प्राण्याचा वावर वाढला आहे. त्यांच्या पुनरुत्पादन क्षमतेसाठी पोषक वातावरण निफाड तालुक्यात आहे. त्यामुळे निफाड तालुक्याची बिबट्यांचा तालुका म्हणून देखील ओळख निर्माण झाली आहे.

या प्रमाणेच इतर सजीव सृष्टी साठीही पोषक वातावरण निफाड तालुक्यात आहे. दारणा व गोदावरी नद्यांचा संगम असलेले गाव म्हणजे दारणासांगवी. या गावात वर्षभरात तीन वेळा पोवळा (रातसर्प) हा साप ए.आर.इ.ए.एस संस्थेचे संचालक व प्राणीमित्र श्रीकांत फड यांनी पकडला आहे तर नुकतेच चितेगांव येथे पोवळा सापाप्रमाणेच दिसणारा काळतोंड्या नावाचा बिनविषारी साप ए.आर.इ.ए.एस संस्थेचे सदस्य सर्परक्षक पवन नागपुरे यांनी पकडला आहे. या दोन्ही सापांची रीतसर वनविभागात नोंदणी करून पुन्हा निसर्गात मुक्त केले आहेत.





### असे दिसतात हे दोन्ही साप

**१) काळतोंड्या (बिनविषारी)**– सरासरी लांबी १० इंच तर अधिक लांबी -१ फूट .६ इंच, रंग- लालसर तपकिरी शरीरावर छोट्या काळ्या ठिपक्यांची रांग, डोके काळे, लांब गोलाकार शरीर, लांब निमूळती शेपूट

**२) पोवळा (विषारी)**– विषारी असला तरी या सापाचा दंश नगण्य आहे व हा साप चावून कोणाही व्यक्ती अथवा जनावरांच्या मृत्यू ची नोंद झालेली नाही, सरासरी लांबी- १ फूट.२ इंच, रंग व आकार- तपकिरी डोके व मान फिकट, आखूड शेपटीवर दोन काळे पट्टे,पोटाकडचा रंग पोवळ्या सारखा लाल. शेपटी खाली निळा आणि काळा रंग.डोळे लहान व काळे. लांब सडपातळ शरीर, मऊ खवले.

दिसतात सारखेच पण एक विषारी आणि एक बिनविषारी साप आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात व नाशिक जिल्ह्यात नाग, मन्यार,घोणस आणि फुरसे हे चार मुख्य विषारी साप आढळून येतात तर हिरवा घोणस (चापडा/ बांबू पिट वायपर) आणि पोवळा किंवा रात सर्प (कोरल स्नेक) हे दोन दुर्मिळ साप आहेत. त्यातील एक दुर्मिळ साप पोवळा दारणा सांगवी येथे वर्षातून तीन वेळेला मिळाला आहे.

> आमच्या चितेगांव गावात व पंचक्रोशीत बिबट्या प्रमाणे नाग,मन्यार, घोणस आणि फुरसे असे चार ही साप आढळून येतात मात्र आता यात दुर्मिळ असलेले साप देखील मिळून येत आहे ही एक अर्थाने जीवसृष्टी ची चांगली साखळी असल्याचे लक्षण आहे.अशाच प्रकारे भविष्यात आणखीन काही दुर्मिळ जाती मिळून या जातींचा शास्त्रीयअभ्यास करून या जातींचे संवर्धन करण्यासाठी त्यांचा अधिवास लक्षात घेऊन तो जतन करण्यासाठी प्रयत्न करून शास्त्रीय माहिती गोळा करू.
>
> – **अमोल सोनवणे,** सर्पअभ्यासक,चितेगाव संचालक ए.आर.इ.ए.एससंस्था.

# भाजपच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसचे अधिवेशन

१९६१ मध्ये गुजरातमधील भावनगर येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन भरले होते. यानंतर, काँग्रेसने एकतर्फी आघाडी घेतली आणि केंद्र सरकारमध्ये आणि गुजरातसह अनेक राज्यांमध्ये बराच काळ टिकून राहिली. ६४ वर्षांनंतर, ८ एप्रिल पासून अहमदाबादमध्ये पुन्हा एकदा काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन होत आहे. 'गुजरात मॉडेल' मोडून काँग्रेस पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे. गुजरात अधिवेशनाद्वारे काँग्रेस मोदी मॉडेल मोडू शकेल का? काँग्रेसने ६४ वर्षांनंतर अधिवेशनासाठी गुजरातची निवड का केली आणि काँग्रेसला याचा कसा फायदा होईल?

----------------

गुजरातमधील अहमदाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन ८ आणि ९ एप्रिल रोजी दोन दिवस चालेल. पहिल्या दिवशी, काँग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय स्मारकात झाली. देशभरातील अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सुमारे २६२ प्रतिनिधी यात सहभागी झालेत. त्याचे अध्यक्षपद मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे होते. सायंकाळी ५ वाजता साबरमती आश्रमात भजन आणि प्रार्थना सभा झाली.

९ एप्रिल २०२५ रोजी मुख्य अधिवेशन शेवटच्या दिवशी साबरमती रिव्हरफ्रंट येथे होणार आहे, ज्यामध्ये सर्व प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष, काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि काँग्रेस कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहतील. या अधिवेशनात राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्यासह सर्व मोठे नेते उपस्थित राहणार आहेत.

या वर्षी महात्मा गांधी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्याची १०० वी जयंती आहे. तसेच सरदार पटेल यांची १५० वी जयंती आहे. दोघेही गुजरातशी संबंधित आहेत. तसेच, काँग्रेसला भाजपकडून सरदार पटेलांचा वारसा परत घ्यायचा आहे. अशा परिस्थितीत, हे सत्र अधिक खास आहे. या कारणास्तव, साबरमती आश्रम आणि सरदार स्मारक सारखी ठिकाणे निवडण्यात आली आहेत.

हे अधिवेशन २०२७ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या रणनीतीचा पाया रचेल. गुजरातमध्ये संघटनेची ताकद वाढवण्याचा आणि भाजपला आव्हान देण्याचा एक मार्ग म्हणून पक्ष याकडे पाहत आहे. याशिवाय, या अधिवेशनाच्या माध्यमातून पक्षाला गुजरात आणि राष्ट्रीय पातळीवर आपले स्थान मजबूत करायचे आहे.

देशातील नवीन राजकीय संस्कृती गुजरातपासून सुरू होते हे काँग्रेस हायकमांडला माहिती आहे. म्हणून, जर काँग्रेसने गुजरात मॉडेल मोडले तर त्याचा परिणाम संपूर्ण देशावर होईल. काँग्रेस येथे एक नवीन मॉडेल तयार करून भाजपची मुळे कमकुवत करू इच्छिते. यामुळे कार्यकर्त्यांना संदेश जाईल की पक्ष गुजरातमध्ये सक्रिय आहे आणि हायकमांडला येथे रस आहे. तसेच, गुजरातमध्ये काँग्रेसला विनोद मानणाऱ्यांचे विचार बदलतील.

राजकीय तज्ज्ञ रशीद किडवई यांचे मत वेगळे आहे. ते म्हणतात, 'काँग्रेसला त्यांची जुनी परंपरा पुन्हा जिवंत करायची आहे. स्वातंत्र्यापासून, दरवर्षी काँग्रेसचे अधिवेशन नवीन राज्यात होत असे, परंतु आणीबाणी लागू झाल्यानंतर ही परंपरा खंडित झाली.

२००२ मध्ये सोनिया गांधी काँग्रेस अध्यक्ष झाल्यानंतर, अधिवेशन फक्त दिल्लीतच होऊ लागले. आता काँग्रेसला असा विचार आला आहे की नवीन राज्यात अधिवेशन घेतल्याने पक्षाची प्रतिमा बदलेल आणि त्यांना त्यांची ताकद कळेल. काँग्रेसने भाजपला त्यांच्या बालेकिल्ल्यातून म्हणजेच गुजरातमधून बाहेर काढण्याचा मार्ग सुरू केला आहे.

देशाच्या राजकारणात 'गुजरात मॉडेल' का महत्त्वाचे आहे? असा प्रश्न अनेकांना पडला आहे . त्यावर रशीद किडवई म्हणतात, 'मोदींनी गुजरातमध्ये एक मॉडेल तयार केले, ज्याचा वापर भाजप राजकीय शस्त्र म्हणून करते. गुजरात मॉडेलच्या बळावर नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पंतप्रधान झाले. देशाचे सध्याचे राजकारण गुजरात मॉडेलभोवती फिरते.

भाजपने गुजरात मॉडेलचा वापर ५ प्रकारे केला...

१. पंतप्रधान मोदींनी गुजरातला 'विकासाचे मॉडेल' म्हणून देशासमोर सादर केले. हे मॉडेल मोठ्या गुंतवणुकी, चांगली वाहतूक आणि मुबलक रोजगाराशी जोडलेले होते. याशिवाय 'व्हायब्रंट गुजरात' आणि 'मोदी है तो मुमकीन है' सारख्या मोहिमा चालवल्या गेल्या.

२. गुजरात मॉडेल मोदींच्या वैयक्तिक यशाशी जोडलेले होते. मोठ्या कॉर्पोरेट्सना आकर्षित करणारा नेता म्हणून त्यांना सादर केले जात होते. राज्याला पुढे नेऊ शकते. यामुळेच भाजपने २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये केंद्रात सरकार स्थापन केले.

३. भाजपने राष्ट्रीय पातळीवर गुजरात मॉडेलची रणनीती पुन्हा मांडली. २००४ मध्ये गुजरातमध्ये विशेष आर्थिक क्षेत्र तयार करण्यात आले आणि २००९ मध्ये विशेष गुंतवणूक क्षेत्र तयार करण्यात आले. या माध्यमातून राज्यातील मोठ्या प्रकल्पांना चालना मिळाली. यानंतर, केंद्रातील मोदी सरकारने 'मेक इन इंडिया' आणि 'इज ऑफ डुइंग बिझनेस' सारख्या मोहिमा सुरू केल्या, ज्यामध्ये गुजरात मॉडेलची झलक दिसून आली. भाजपने इतर राज्यांमध्ये आणि केंद्रात याचा फायदा घेतला.

४. भाजपने विरोधकांविरुद्ध, विशेषतः काँग्रेसविरुद्ध गुजरात मॉडेलचा वापर केला. याद्वारे भाजपने दाखवून दिले की काँग्रेसकडे असे कोणतेही ठोस मॉडेल नाही, तर भाजपकडे गुजरातसारखे 'यशस्वी' मॉडेल आहे.

५. गुजरातमधील विविध समुदायांचे लोक बऱ्याच काळापासून शांततेने एकत्र राहत आहेत. २००२ पासून, दंगली झाल्या नाहीत किंवा दंगल सदृश परिस्थिती निर्माण झाली नाही.

ज्याप्रमाणे भाजपने गुजरात मॉडेलने संपूर्ण देशाला भुरळ घातली, त्याचप्रमाणे काँग्रेसलाही तेच करावे लागेल. हे इतर कोणत्याही राज्यात घडू शकते, परंतु भाजपची मुळे गुजरातशी जोडलेली आहेत. या कारणास्तव, गुजरातमधूनच भाजप तोडता येईल.

गुजरातमध्ये भाजपच्या तुलनेत काँग्रेसची स्थिती विचारात घेतल्यास १८२ जागांच्या गुजरात विधानसभेत, १९८५ मध्ये काँग्रेसने विक्रमी १४९ जागा जिंकल्या होत्या. पण त्यानंतर काँग्रेसच्या जागा हळूहळू कमी होऊ लागल्या.

२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने १८२ पैकी १५६ जागा जिंकून सरकार स्थापन केले. त्याच वेळी, काँग्रेसच्या जागा १७ पर्यंत कमी झाल्या. त्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक लढवणाऱ्या 'आप'ने काँग्रेसची १३% मते कमी केली होती. निवडणुकीच्या एक वर्षानंतर, काँग्रेस आमदारांची पक्ष सोडण्याची प्रक्रिया सुरू झाली. सध्या भाजपकडे १६१ जागा आहेत आणि काँग्रेसकडे १२ जागा आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुका काँग्रेस आणि आपने एकत्र लढल्या. असे असूनही, काँग्रेसला २६ पैकी फक्त एकच लोकसभा जागा जिंकता आली. तर भाजपचा मतांचा वाटा ६१.८६% आणि काँग्रेसचा मतांचा वाटा ३१.२४% होता. तथापि, काँग्रेसला २० विधानसभा जागांवर फायदा झाला, जो २०२२ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत सुधारणा दर्शवितो.

फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला. भाजपने ६८ पैकी ६० नगरपालिका जिंकल्या, तर काँग्रेस १३ नगरपालिकांवरून एका नगरपालिकेवर आली.

याशिवाय, भाजपचे संघटन मजबूत आणि एकसंध आहे, तर काँग्रेस नेतृत्वाच्या अभावाने आणि पक्षांतराने झुंजत आहे. एकंदरीत, प्रत्येक निवडणुकीत भाजपचे वर्चस्व असते, तर काँग्रेस मागे पडते.

गुजरातमधील काँग्रेस नेतृत्वात दोन प्रकारचे लोक आहेत. त्यांच्यात एक प्रकारचा मतभेद आहे. काही लोक असे आहेत जे जनतेसोबत उभे राहतात आणि त्यांच्या हृदयात काँग्रेसची विचारसरणी आहे. दुसरे म्हणजे जे जनतेपासून तुटलेले आहेत, दूर बसलेले आहेत आणि त्यापैकी निम्मे भाजपशी संबंध ठेवणारे आहेत. जरी आपल्याला १०, १५, २०, ३० किंवा ४० लोकांना काढून टाकावे लागले तरी आपण ते एक उदाहरण घालून करू.

परंतु, गुजरात अधिवेशनाद्वारे काँग्रेस मोदी मॉडेल मोडू शकेल का? हा प्रश्न तितकाच महत्वाचा आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, काँग्रेसला तळागाळात मोठे काम करावे लागेल. ते म्हणतात, 'गुजरातमध्ये काँग्रेसची मतपेढी मुस्लिम आणि आदिवासींची आहे.' विकासाच्या नावाखाली भाजपला मतदान करणाऱ्या गुजरातींनाही काँग्रेसला शांत करावे लागेल. गुजरातला मॉडेल म्हणून ओळखले जात असले तरी, प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. गुजरातमधील छोट्या मुद्द्यांवरूनच काँग्रेसला मोठा विजय मिळू शकतो.

काँग्रेसने नवीन पिढीमध्ये म्हणजेच तरुण आणि महिलांमध्ये प्रवेश केला तर त्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. ते म्हणतात, 'गुजरातमधील एका संपूर्ण पिढीला काँग्रेसचे नेतृत्व कसे होते हे माहित नाही. खरं तर, गेल्या ३० वर्षांपासून गुजरातमध्ये भाजप सत्तेत आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसला नवीन पिढीपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. तसेच, काँग्रेसला मोठ्या संख्येने महिलांची भर घालावी लागेल. गुजरातमधील लोकांना भाजपचा पर्याय हवा आहे, परंतु काँग्रेस अपेक्षा पूर्ण करू शकत नाही.

दुसरा मतप्रवाह असा की, काँग्रेस मोदी मॉडेल मोडू शकते, पण ते सोपे काम नसेल. गुजरातमध्ये काँग्रेस बॅकफूटवर असल्याचे दिसून येते. यामुळे, काँग्रेसमध्ये अजूनही सुधारणेला वाव आहे. यासाठी काँग्रेसच्या प्रत्येक लहान-मोठ्या नेत्याला आणि कार्यकर्त्याला कठोर परिश्रम करावे लागतील. गुजरातमध्ये २ वर्षांनी निवडणुका आहेत. अशा परिस्थितीत काँग्रेसकडे वेळ आहे. जर पक्षाने याचा फायदा घेतला तर काहीतरी साध्य होऊ शकते.

राहुल गांधींना गुजरातमध्ये काँग्रेस मजबूत हवी आहे. पण यासाठी त्यांच्याकडे मजबूत सैन्य आणि एक मजबूत सेनापती दोन्ही असले पाहिजेत. दुर्दैवाने गुजरात काँग्रेसकडे दोन्ही नाहीत. गुजरात काँग्रेसला अशा नेत्याची गरज आहे जो लढाऊ असेल. दुसरे वास्तव असे आहे की काँग्रेसकडे संघटना चालवण्यासाठी पैसे नाहीत.

भाजपप्रमाणेच काँग्रेसलाही आपले संघटन मजबूत करावे लागेल, असे रशीद किडवाई यांचे मत आहे. ते म्हणतात, 'भाजपची ताकद त्यांच्या संघटनेत आहे. त्यांच्या संस्थेला निवडणूक यंत्र म्हणतात. काँग्रेसलाही आपले संघटन मजबूत करावे लागेल. स्थानिक पातळीवर कार्यकर्ते निर्माण करून आपल्याला निवडणुका लढवाव्या लागतील.

देशासाठी त्याच्या विचारसरणीसह एक नवीन धोरण सादर करावे लागेल. गुजरातमध्ये काँग्रेसला एका मजबूत नेतृत्वाची गरज आहे, जे भाजपला आव्हान देऊ शकेल. याशिवाय, पक्षाला पाठिंबा देऊ शकतील अशा विश्वासू नेत्यांची आणि कार्यकर्त्यांचीही पक्षाला गरज आहे. तथापि, राहुल यांना याची आधीच जाणीव आहे.

काँग्रेस केवळ अधिवेशन घेऊन मोदी मॉडेल मोडू शकत नाही. ते म्हणतात, 'जेव्हा जेव्हा एखादा पक्ष बैठक किंवा अधिवेशन आयोजित करतो तेव्हा तो जनतेसमोर एक नवीन उदाहरण मांडण्याची एक चांगली संधी असते. एक नवीन आणि मजबूत रणनीती तयार करा आणि त्यावर काम करा. काँग्रेस आणि भाजपमधील फरक असा आहे की भाजप केवळ रणनीती बनवते आणि ती सार्वजनिक करतेच असे नाही तर जमिनीवर त्यावर काम देखील करते. तर काँग्रेसच्या बाबतीत असे नाही. कुठेतरी, काँग्रेसला भाजपच्या मार्गावर चालत भाजपला तोडावेच लागेल.

तथापि, या अधिवेशनाच्या माध्यमातून काँग्रेस आपल्या कार्यकर्त्यांना सक्रिय राहून भाजपचा धैर्याने सामना करण्याचा संदेश देऊ शकते. बघुया, या अधिवेशनाने काँग्रेस काय साध्य करते?

■ ■ ■





# संगीत रंगभूमीचे वैभव : अशोक परांजपे

मूळ सांगली जिल्ह्यातील हरीपूरचे असलेले अशोकजी परांजपे यांनी केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर, अवघे गरजे पंढरपूर, कैवल्याच्या चांदण्याला, नाविका रे वारा वाहे रे, ही आणि इतरही अनेक प्रसिद्ध मराठी गाणी लिहिली.

अशोक गणेश परांजपे हे पट्टीचे मराठी गीतकार होते. ते मुंबई येथे महाराष्ट्र राज्य लोककला संचालनालयाचे संचालक होते. त्यानंतर ते औरंगाबादला स्थायिक झाले होते. त्यांनी भक्तिगीत, भावगीत, अंगाईगीत, लावणी, गण-गवळण आणि नाट्यगीत या प्रकारची गीते लिहिली. इंडियन नॅशनल थिएटर- आयएनटी रिसर्च सेंटरचे त्यांचे काम सुरू असताना त्यांनी महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये जाऊन तेथील लोक कलावंतांच्या लोककलेच्या ध्वनिफिती तयार केल्या. परांजपेंनी १९९२मध्ये पंढरपूर भक्तिसंगीत महोत्सव आणि १९८६मध्ये आनंदवन येथील महाराष्ट्र आदिवासी कला महोत्सव, असे दोन महोत्सव आयोजित केले. या कामाची नोंद फोर्ड फाउंडेशनने घेतली.

ऑस्ट्रियातील इन्स्टिट्यूट ऑफ व्हिडिओग्राफी-आयओव्ही या आंतरराष्ट्रीय लोककला संस्थेने त्यांना सभासदत्व दिले. त्यानंतर त्यांनी अनेक मराठी कलावंतांना फ्रान्स, आयर्लंड, जपान आदी देशांत नेऊन तेथे त्यांना कला सादर करण्याची संधी मिळवून दिली. अशोक गणेश परांजपे हे महाराष्ट्रातील लोककला संशोधक, गीतकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म ३० मार्च १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील हरिपूर येथे झाला. त्यांचे वडील गणेश परांजपे हे आयुर्वेदाचार्य होते. हरिपूर ही भूमी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या नावाने ओळखली जाते.

शालेय जीवनापासूनच त्यांना सांगली परिसरातील लोककलांचे विलक्षण आकर्षण वाटू लागले. शाहीर आनंदराव सूर्यवंशी, शाहीर बापूराव विभूते, तमाशा कलावंत शंकर तात्या सावजळकर, काळू-बाळू अशा लोककलावंतांशी त्यांचा संपर्क होता. शाहिरी, सोंगी भारुड दत्तपंथी भजन, तमाशा, तलवार, दांडपट्टा, करपल्लवी या लोककला सांगली परिसरात लोकप्रिय होत्या. त्या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. लेखन, वाचन, चित्रकारी सोबतच कुस्तीची त्यांना आवड होती. मुंबईत आल्यावर जे.जे.स्कुल ऑफ आर्टमध्ये त्यांनी चित्रकलेचे धडे घेतले.

१० ऑक्टोबर १९७८ रोजी इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्राची स्थापना वगसम्राट दादू इंदुरीकर यांच्या हस्ते झाली. या संशोधन केंद्राचे संचालक म्हणून अशोकजींनी जबाबदारी स्वीकारली. १९८६ साली इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्रातर्फे आनंदवन वरोरा येथे आदिवासी महोत्सवाचे आयोजन त्यांच्या संकल्पनेतून झाले होते. ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी या आदिवासी महोत्सवाचे मार्गदर्शक होते.

१९९२ मध्ये पंढरपूर येथे भक्तीसंगीत महोत्सवाचे आयोजन त्यांच्याच संयोजनाने झाले होते. फ्रान्स, आयलंड, जपान आदी देशांत महाराष्ट्रातील लोककलांची पथके नेवून तेथे मार्गदर्शन केले. खंडोबाचे जागरण, देवीचा गोंधळ, कोकणातील दशावतार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या कला, पारंपरिक तमाशा, कीर्तन, लळीत अशा लोककलांच्या जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्यांनी आयएनटीच्या लोक प्रायोज्य कलेच्या संशोधन विभागाचे संचालक असताना कार्य केले.

तमाशा अभ्यासक रुस्तुम अचलखांब, शाहीर बापूराव विभूते, गोंधळमहर्षी राजारामबापू कदम, चित्रकथी बाहुलेकार गणपत मसगे, परशुराम गंगावणे, पारंपरिक वाद्ये शंकरराव जाधव धामणीकर, दशावतारी कलावंत बाबी नालंग अशा अनेक लोककलावंतांचे कार्यक्रम त्यांनी मुंबईत छबिलदास सभागृहात आयोजित केले. खंडोबाचे जागरण, लळीत, दशावतार, वासुदेवांची गाणी, नमन खेळे, मादळ यांसारख्या आदिवासी कला यावर अभ्यासपूर्ण पुस्तिका त्यांच्या संकल्पनेतून आयएनटीने प्रसिद्ध केल्या. खंडोबाचं लगीन, दशावतारी राजा, जांभूळाख्यान, वासुदेव सांगती, अरे रे संसार, मातीचं स्वप्न अशा आयएनटी संशोधन केंद्राच्या संशोधन नाट्यांची मूळ संकल्पना आणि लेखन मार्गदर्शन परांजपे यांचे होते.

महाराष्ट्रात लोककलांच्या संशोधनाची नवी परंपरा निर्माण करून तरुण अभ्यासकांची फळी महाराष्ट्रभर उभी करण्याचे श्रेय त्यांना जाते. प्रकाश खांडगे, तुलसी बेहेरे, रमेश कुबल, गणेश हाके, सुरेश चव्हाण, पंढरीनाथ काळे, सुरेश चिखले, रामचंद्र वरक अशा तरुण अभ्यासकांची फळी त्यांनी निर्माण केली. त्यांना त्यांचा अभ्यास विषय असलेल्या लोककलांमध्ये मार्गदर्शन केले.

अशोक परांजपे यांचे मराठी रंगभूमीवरील योगदान नाटककार म्हणून उल्लेखनीय आहे. संत कान्होपात्रा, संत गोरा कुंभार, अबक दुबक, बुद्ध इथे हरला आहे, आतून कीर्तन वरून तमाशा, दार उघड बया सारखी संगीत रंगभूमीचे वैभव वाढविणारी नाटके त्यांनी लिहिली. नाटकांसोबतच वर्तमानपत्रात त्यांनी स्तंभ लेखन केले. अनोळखी पाऊले ही त्यांची स्तंभलेखन मालिका अतिशय प्रसिद्ध होती. लोककलांचे संशोधन, नाट्यलेखन या सोबतच ते गीतकार म्हणूनही लोकप्रिय होते.

अवघे गर्जे पंढरपूर, आला आला सुगंध मातीचा, एकदाच यावे सखया, कुणी निंदावे वा वंदावे, केतकीच्या बनी तिथे, दारी उभी अशी मी, दीनांचा कैवारी, नाम आहे आदी अंती, नाविका रे, पाखरा जा दूर देशी, पैलतीरी रानामाजी, वाट इथे स्वप्नातील संपली जणू, आला आला सुगंध मातीचा अशी अनेक लोकप्रिय गीते त्यांनी लिहिली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. लोककला संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. अशोकजी परांजपेंनी ९ एप्रिल २००९ रोजी त्यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या अविस्मरणीय अनेक स्मृतींना विनम्र अभिवादन !!

---------------

: संकलन व शब्दांकन :
**एन. कृष्णकुमार, से. नि. अध्यापक**
**गडचिरोली.**
**७७७५०४१०८६.**

■ ■ ■

# धर्मदाय रूग्णालयावर असावी सरकारची करडी नजर

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशाअभावी उपचार नाकारल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्याने प्रसुतीदरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी धर्मदाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणावरून पुण्यात रूग्णालयाच्या बाहेर विविध संघटनांकडुन आंदोलन करण्यात आले होते. १० लाख रुपये जमा न केल्यामुळे महिलेला रूग्णालयात भर्ती करण्यास रूग्णालय प्रशासनाने मनाई केली. यानंतर त्या महिलेने दोन जुळव्या मुलांना जन्म दिला व तिचा यात मृत्यू झाला.

यानंतर आता रूग्णालयाकडून एक पत्रक जारी करण्यात आले असून यानंतर रूग्णांकडून डिपॉझिट घेतले जाणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात अनेक प्रकारचे उपचार रूग्णांवर होतात. त्यामुळे सर्व चूक रूग्णालयाची आहे असे म्हणून चालणार नाही. परंतु या केसमध्ये नक्कीच असंवेदनशीलपणा दाखविण्यात आला आहे ही बाब तेथील झालेल्या घटनेवरून स्पष्ट दिसून येते. कारण गर्भवती महिलेचा मृत्यू अंगावर शहारे येणारा आहे. त्यामुळेच तेथील नागरिक किंवा आप्त आक्रमक झालेत.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

कोणतेही रूग्णालयात असो रूग्णालयात येणारा प्रत्येक व्यक्ती आपल्या वेदना घेऊन येत असतो.कारण कोणत्याही रूग्णांची आपात्कालीन प्रकृती खराब झाली तर आपल्या परिस्थितीनुसार खाजगी किंवा सरकारी किंवा धर्मदाय रूग्णालयाकडे धाव घेऊन रूग्णांवर आपात्कालीन परिस्थितीत ताबडतोब उपचार व्हावेत अशी इच्छा संपूर्ण रूग्णांच्या नातेवाइकांची असते.अशा परिस्थितीत रूग्णांचे परिवार आपल्या ऐपतीप्रमाणे पैसा गोळा करून त्या-त्या रूग्णालयात उपचार घेतात.

परंतु आपण जेव्हा धर्मदाय रूग्णालयाची परिभाषा करतो तेव्हा आपात्कालीन परिस्थितीत कोणताही रूग्ण असो त्यावर रूग्णालय प्रशासनाने ताबडतोब उपचार करायला हवेत.कारण हा जिवन मरणाचा प्रश्न असतो.कारण यात थोडीशी चूक किंवा वेळ झाला तर तो रूग्ण दगावतो आणि हाच प्रकार दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झाला.

आपण डॉक्टरांना दैवी शक्ती असल्याचे मानतो त्याचपध्दतीने रूग्णालय प्रशासनाने तत्परता दाखविने गरजेचे असते. रूग्णालयाला सुध्दा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो यात दुमत नाही.कारण स्टाफ कमी असने अशाप्रकारे अनेक अडचणी त्यांच्या समोर सुध्दा असु शकतात यालाही नाकारता येत नाही.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अशा घटनांमुळे राज्यात एक वेगळाच संदेश जातो. कारण राज्यात तब्बल ४७६ धर्मदाय रूग्णालये (ट्रस्ट हॉस्पिटल) आहेत. त्यामुळे आता आरोग्य विभाग व सरकारची जबाबदारी आहे की या संपूर्ण रूग्णालयाची काय अवस्था आहे किंवा रूग्णालय प्रशासनाच्या काय-अडचणी आहेत किंवा या रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांवर योग्य उपचार होतो की नाही किंवा हयगय तर होत नाही ना ? या संपूर्ण गोष्टींवर आता सरकारने करडी नजर ठेवण्याची गरज आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांना आश्वस्त केले की भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी एक निश्चित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे काम सुरू आहे. याचे मी मनापासून स्वागत करतो .कारण पुढे अशा घटना होणार नाही याची ताबडतोब दखल मुख्यमंत्री महोदयांनी घेतली.

पुण्यातील घटना पहाता राज्यातील संपूर्ण सरकारी रूग्णालयाने, निमसरकारी रूग्णालयाने, धर्मदाय रूग्णालयेसह खाजगी रुग्णालयांनी आपात्कालीन परिस्थितीत रूग्णांना सवोतोपरी मदत केली पाहिजे.कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालये मोठ्या प्रमाणात पैसा वसूल करतात यावर सुध्दा सरकारने अंकुश लावने गरजेचे आहे.कारण शेवटी माणूस हा माणूस असतो त्यामुळे धर्मदाय रूग्णालयांसोबतच खाजगी रुग्णालयांनी सुध्दा माणुसकी या नात्याने गरीब-निर्धन व सर्वसामान्यांना सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून दिले तर ही खरी मानव सेवा समजली जाईल.

कारण महागाईच्या काळात गरीब व सर्वसामान्यांना सर्वच बाबतीत मोठी कडवी झुंज द्यावी लागते या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून संपूर्ण रूग्णालयांनी माफक दरात उपचार करण्यास स्वतःहुन तत्परता दाखवली तर अनेकांना जिवदान मिळेल व डॉक्टरांची दैवी शक्ती दिसून येईल.

# किवी खाण्याची योग्य पद्धत



उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी आहारात निरोगी पदार्थांचे सेवन करणे महत्त्वाचे असते. शरीराला योग्य आणि निरोगी ठेवण्यासाठी आहारामध्ये फायबर्स, प्रोटिन्स आणि व्हिटॅमिन्सचा समावेश करणे गरजेचे असते. निरोगी आरोग्यासाठी, किवी हे एक सुपरफूड मानले जाते, ज्यामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर असतात. पण जेव्हा ते खाण्याचा विचार येतो तेव्हा अनेकदा प्रश्न पडतो की, किवी सोलून खावे की न सोलून?

आरोग्यासाठी, किवी हे एक सुपरफूड मानले जाते. बरेच लोक किवी सोलून खातात, तर बरेच जण ते न सोलता खातात.

**किवी सोलून खाण्याचे फायदे..**

किवी सोलन खाल्ल्यामुळे ते अधिक मऊ आणि चविष्ट लागते. ज्यांना सालीचा पोत आवडत नाही त्यांच्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे. ज्या लोकांना ॲलर्जी आहे किंवा संवेदनशील त्वचा आहे त्यांना फायदा होऊ शकतो, कारण काही लोकांना सालीमुळे हलकी खाज येऊ शकते.

**किवी सोलून खाण्याचे तोटे**

किवीची साल सोलून खाल्ल्यामुळे त्यामधील फायबर आणि पोषक तत्वांचे नुकसान होते, कारण सालीमध्येच बहुतेक फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. किवी साल काढून टाकल्याने व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक तत्वांचे प्रमाण कमी होते. किवीचे सेवन आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असते.

**किवी न सोलता खाल्ल्यास काय होते?**

किवी न सोलता खाल्ल्यामुळे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतेच्या समस्यांमध्ये फायदेशीर आहे. किवीच्या सालीमध्ये सालीमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेसाठी फायदेशीर असतात.

किवीची साल रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते.

काही लोकांना किवीच्या सालीचा खडबडीत पोत आवडत नाही. जर किवी व्यवस्थित स्वच्छ केली नाही तर त्यात धूळ किंवा कीटकनाशके असू शकतात. त्वचेची संवेदनशीलता असलेल्या लोकांना सौम्य खाज येऊ शकते.

जर तुम्हाला किवीची साल खायची असेल तर या गोष्टी लक्षात ठेवाः घाण आणि रसायने काढून टाकण्यासाठी किवी पूर्णपणे धुवा. साल थोडीशी ब्रश करून किंवा हलक्या हाताने घासून स्वच्छ करा, जेणेकरून त्याचा खडबडीतपणा कमी होईल. तुम्ही किवी स्मूदी किंवा ज्यूसमध्ये मिसळून सहज सेवन करता येते. किवीचे लहान तुकडे करून खा, यामुळे खाताना साल कमी जाणवेल.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### क्या सीन है!

उष्णतेच्या लाटेनं
माणसं झालीत फ्राय
वरून महागाईचा तडका
करतोय त्यांना ड्राय ...

एवढयात समाधान नाही
म्हणून गॅसही महागला
' आम आदमी ' चा जीव
आता भलताच कावला..!

राजकीय पक्षांची सुरु
एकमेकांवर कुरघोडी
गरीबांच्या समस्येत
नाही कुणा भौ गोडी... !

## महत्त्वाचे

### गोकुळ झिरवाळ यांच्यातर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन

**दिंडोरी ।** अन्न व औषधें प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ हे सातत्याने रुग्णसेवेसाठी तत्पर असून, त्यांनी नाशिक मुंबईमध्ये स्वतंत्र रुग्णसेवकांची नियुक्ती करून गोरगरीब जनतेला आरोग्य सेवेचा लाभ मिळवून देत आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून त्यांचे पुत्र गोकुळ झिरवाळ हे शिबिराचे आयोजन करत रुग्णांपर्यंत सेवा पोहचवत आहेत. गरजू रुग्णांनी या शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वासराव देशमुख यांनी केले आहे. जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधत गोकुळ झिरवाळ यांचे संकल्पनेतून दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात नरहरी झिरवाळ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी देशमुख बोलत होते. या शिबिरास रुग्णांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत ७७५ रुग्णांनी या लाभ घेतला. रुग्णांच्या हस्ते फीत कापून शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कादवाचे संचालक बाळासाहेब जाधव, जेष्ठ नेते विश्वासराव देशमुख, प्रकाश शिंदे भाजप नेते चंद्रकांत राजे, माजी नगराध्यक्ष कैलास मवाळ, शिवाजी बाबा पिंगळ, उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ, गोकुळ झिरवळ, प्रीतम देशमुख, कैलास देशमुख, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष राजेंद उफाडे, हेमंत पगारे, उपनगराध्यक्ष माधुरी साळुंखे, शैला उफाडे, सुजित मुरकुटे, दीपक जाधव, नितीन गांगुर्डे, कृष्णा मातेरे, विनोद आप्पा देशमुख, विष्णुपंत पाटील, प्रशांत पाटील, प्रतीक जाधव, रमेश बोरस्ते, मनोज ढिकले, संदीप गोतरने, विक्रम मवाळ अनिकेत बोरस्ते, राहुल कावळे, नितीन भालेराव, दीपक धूमने, बबन जाधव, सत्यजित राजे, बापू तासकर, परीक्षेत देशमुख, अभिषेक देशमुख, तुषार घोरपडे, सलीम मिर्झा, डॉ.राहुल जाधव, निवृत्ती घुमरे, सरफराज तांबोळी, विकी घोलप, किरण जाधव, श्रीराम जाधव, समाधान आपसुंदे, विशाल बस्ते, सिताराम जाधव आदी उपस्थित होते. शिबिरात एकूण ७७५ रुग्णांची तपासणी करण्यात आली यात ४६१ रुग्णांना उपचार सुचविण्यात आले. त्यात ३१८ मोतीबिंदू, ४ तिरळेपणा २ आर्टिफिशियल डोळ्यांचा तर १३७ रुग्णांना चष्मा सुचविण्यात आला.नरहरी झिरवाळ चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे रुग्णांचे ऑपरेशन व चष्मे वाटप करण्यात येणार आहे तसेच यापुढेही विविध आजारांचे तपासणी उपचार शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. शशिकांत आवारी, डॉ सृष्टी घुगे, डॉ. हेमंत घांगले, डॉ समीर काळे, डॉ ओम् कदम, डॉ. पुणवत्कर, डॉ. प्रमोद गजबे आदी वैद्यकीय पथकाने तपासणी केली.

### राजयोगिनी ब्रह्माकुमारी स्व. डॉ. रतन मोहिनी दादीजी अनंतात विलीन

**माऊंट अबू येथील ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी डॉ. रतन मोहिनी दादीजी यांनी मंगळवारी दि. ८) वयाच्या १०१ व्या वर्षी देहत्याग केला. त्यांना देशभरातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. नाशिक शाखेतर्फेही त्यांना भावसुमने अर्पण करण्यात आली. त्यांच्याविषयी थोडंसं...**

दीदींचे संपूर्ण आयुष्य हे ईश्वर सेवा, आत्मशुद्धी आणि मानवतेसाठी झटण्यात गेलं. अति दीर्घ काळ त्यांनी ब्रह्मकुमारी संस्थेच्या माध्यमातून लोकसेवा केली.

**दादीजींचं जीवन:**- डॉ. रतन मोहिनी दादीजी यांचा जन्म १९२४ मध्ये झाला. लहान वयातच त्या ब्रह्माकुमारीज् संस्थेशी जोडल्या गेल्या. त्यांनी आयुष्यभर विश्व सेवेसाठी स्वतःला समर्पित केलं. साधेपणा, प्रेम, नम्रता आणि राजयोगच्या अभ्यासाने त्यांनी अनेकांना आत्मज्ञानाची वाट दाखवली. त्यांनी भारतासह अनेक देशांमध्ये प्रवास करून ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या सेवांचा विस्तार केला. लाखो लोकांना त्यांनी राजयोग शिकवला आणि त्यांच्या जीवनात शांतता, सकारात्मकता आणली.

**नेतृत्व आणि सेवा:**- दादीजींनी २०२१ पासून ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या मुख्य प्रशासिकेची जबाबदारी स्वीकारली. वयाची १०० वर्षे ओलांडूनही त्या पूर्ण ताकदीने सेवेत सक्रिय होत्या. त्यांचा आवाज शांत होता, पण शब्द प्रभावी होते. त्या एक प्रेमळ आईसारख्या सर्वांना मार्गदर्शन करत.

**भावपूर्ण श्रद्धांजली:**- आज जरी त्या आपल्या मध्ये नसल्या, तरी त्यांचं विचारधन, शिकवण आणि आत्मिक प्रेम आपल्या हृदयात सदैव जिवंत राहील. त्यांनी दाखवलेली सत्याची, शांतीची आणि प्रेमाची वाट हीच खरी श्रद्धांजली ठरेल. दादीजी, आपलं पवित्र जीवन आणि आध्यात्मिक मार्गदर्शन आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहील. आपल्या चरणी कोटी कोटी प्रणाम।नाशिक जिल्हा ब्रह्माकुमारीज परिवाराच्या वतीने भावपूर्ण आदरांजली! ॐ शांती।



**- राजयोगिनी ब्रम्हाकुमारी वासंती दीदी, जिल्हा मुख्य संचालिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय, नाशिक जिल्हा**

# अवैध सावकारी इथली संपत नाही

## पोलिसांची कारवाई स्तुत्यच; अजूनही अनेक धेंड मोकळेच







अवैध सावकारी पोलिसांच्या रडारवर आल्याने पोलिसांनी कारवाईचा फास आवळत काहींना लक्ष्य केले. त्यांची झाडाझडती केली. याबाबत कार्यवाही अन कारवाई सुरू केल्याने या अवैध सावकाराचा जाच सोसलेल्या आणि अद्यापही सोसत असलेल्या कर्जदारांना दिलासा लाभला आहे. पोलिसांनी अवैध सावकारांविरोधात घेतलेली भूमिका अतिशय स्तुत्यच आहे यात शंका नाही; परंतु पोलिसांनी केलेली ही कारवाई नक्कीच पुरेशी नाही. याबाबत या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन त्याची पाळे मुळे उखडून फेकणे अति आवश्यक आहे. तेव्हाच या प्रश्नाची तीव्रता कमी होऊन सामान्य माणसाची होणारी घुसमट, होरपळ कमी होऊ शकेल.

पोलिसांनी आवाहन करीत अवैध सावकाराच्या पाशात अडकलेल्या नागरिकांना समोर येऊन तक्रार दाखल करण्यास सांगितले आहे. तक्रारदार पुढे आला तरच पोलिसांना कारवाईचा फास घट्ट आवळता येणार आहे. इथेच तर खरी मेख अडकली आहे. या अवैध सावकारांची दहशतच एवढी आहे की कुणी तक्रार करण्यास धजावतच नाही. व्यक्ती आर्थिक विवंचनेत अडकलेला असल्याने तो सावकार म्हणेल तसे नाईलाजाने ऐकतो अन तिथूनच हे सावकार अधिक मुजोर होतात. हे अवैध सावकारी करणारे लोकं राजकीय मंडळींशी संबंधित असल्याने तसेच ते गुंड-गुन्हेगारी प्रवृत्तीची असल्याने त्यांचे चांगलेच फावते. आजी माजी लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे नेते, पुढाऱ्यांचे होयबा, गुन्हेगार क्षेत्राशी संबंधित मंडळी आणि पोलिसांचीही वरदहस्त लाभलेली मंडळी अवैध सावकारी करतात. बड्या पडद्याआडील सावकाराकडून त्यांचे हस्तक-जवळचे कार्यकर्ते २ ते ४ टक्के दर व्याजाने मोठ्या रकमा घेतात अन गरजूंना ८ ते १० टक्के त्याहीपेक्षा जास्त दराने व्याजाने पैसे वाटतात. दर महिन्याला पगाराने वसुलीसाठी माणसं ठेऊन त्यांच्याकडून वसुली करवून घेतात. बडी पडद्याआडील मंडळी कधीच समोर येत नाही. त्यांनी ज्यांना व्याजाने पैसे फिरवण्यासाठी भांडवल दिलेले असते त्यांच्या लोकांचा आणि कर्जदारांचा प्रत्यक्ष संबंध येतो. ही व्याजाने पैसे देणारी आणि वसुली करणारी मंडळी बड्या पडद्याआडील मंडळींच्या जीवावर भाईगिरी करतात. वसुलीसाठी कोणत्याही थराला जातात. मारहाण करतात, मानसिक छळवाद करतात, प्रचंड अपमानित करतात, घरातील वस्तू- वाहने उचलून आणतात; पण संबंधित कर्जदार अडकलेला असल्याने तो काहीच करू शकत नाही. त्यातूनच मग ते नैराश्याने ग्रस्त होऊन प्रसंगी आत्मघातही करून घेतात.

जे अवैध सावकाराकडून कर्ज घेतात ते नाईलाजाने हा मार्ग स्वीकारतात. त्यांना पुढे काय होईल याची कल्पनाही असते. एखाद्या वेळी वेळेवर व्याज दिले जाणार नाही याचीही जाणीव असते. सावकाराचे सर्व पैसे चुकते करण्याची तयारी-मानसिकताही असते; पण मिळणाऱ्या वा येणाऱ्या पैशांचे वेळेवर जुगाड न जमल्याने तारीख चुकते अन छळवाद सुरू होतो. पोलिसांनी बोटावर मोजण्याइतपत सावकारांच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्यामुळे अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असले तरी अवैध सावकारी किंचितही कमी झालेली नाही! त्यामुळे पोलिसांनी या प्रश्नाच्या थेट मुळाशी जायचा प्रयत्न करायला हवा. ज्यांनी सावकारांकडून व्याजाने पैसे घेतले त्यांनी ते परतफेड करू नये असे मुळीच म्हणायचे नाही. फक्त काही कारणास्तव पैसे देण्यास दिरंगाई होत असेल तर सहकार्य करावे अन दहशतवाद, भाईगिरी करू नये एवढीच माफक अपेक्षा कर्जदारांची आहे. व्याजाने घेतलेली रक्कम व्याजासह फेडूनही जर त्याच्याकडून भाईगिरीने पैसे वसूल केले जात असेल, त्रस्त केले जात असेल तर त्याच्यावर कठोर शासन झालेच पाहिजे. व्याज देण्याच्या एक दोन तारखा चुकल्या तरी व्याजावर व्याज लावून वसूल केले जाणारे अव्वाच्या सव्वा रुपये हेही अत्यंत चुकीचे आहे. अवैध सावकारांचीही रिंग आहे. एखाद्याला ठरवून लक्ष्य केले जाते. ठराविक रक्कम व्याजाने देताना करारनामा, कोरे धनादेश, अनामत वस्तू, वाहनांचे कागदपत्रे, इस्टेटीची कागदपत्रे सावकारांकडून ताब्यात घेतली जातात. अनेकदा व्यवहार पूर्ण होऊनही ताब्यातील वस्तू-कागदपत्रे देण्यास टाळाटाळ केली जाते. कर्जदाराने त्यासाठी तगादा लावला तर त्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पैशांची मागणी करत असल्याचे अनेक नडलेल्या कर्जदारांनी दैनिक महासागरशी बोलताना सांगितले.

### राजकीय क्षेत्रातील पडद्याडील सावकार मोकळेच

नाशिक शहर-जिल्ह्यात विविध राजकीय पक्षातील मंडळी अवैध सावकारीत गुंतलेले आहेत. या मंडळींचा खूप मोठ्या प्रमाणात पैसा व्याजाने फिरत असल्याची खमंग चर्चा आहे. यांच्यामध्ये आजी माजी लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नेते, पुढाऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे पोलिसांना कदाचित मुळाशी पोहोचण्यात अडचणी येत असाव्यात, असे वाटते. या बड्या लोकांचा पैसा छोटी मंडळी अर्थात या लोकांचे जवळचे लोकं, कार्यकर्ते जास्त व्याजदराने बाजारात फिरवतात. मोठे-बडे धेंड मात्र नामानिराळी राहतात. या मंडळींनी कोट्यवधी रुपये व्याजाच्या धंद्यात गुंतविले असल्याची खमंग चर्चा आहे.

### रेल्वे प्रवासादरम्यान महिलेने कन्यारत्नाला दिला जन्म



**देवळाली कॅम्प ।** वाराणसीहून मुंबईकडे येणाऱ्या महानगरी एक्सप्रेसमधून प्रवास करत असलेल्या गर्भवती महिलेने प्रवासा-दरम्यान कन्यारत्नाला जन्म दिला.

मध्य प्रदेशातील महाराजगंज (छत्रपूर) येथील रहिवासी मंगल कोंडाम हे पत्नी रेशमा यांच्या सह मुंबईकडे जात असताना, भुसावळ स्थानक सुटल्या नंतर रेशमा यांना प्रसूतीकळा जाणवू लागल्या. त्यावेळी सहप्रवासी महिलांनी त्यांना धीर दिला, तर काही प्रवाशांनी तातडीने रेल्वे विभागाला याबाबत माहिती दिली. माहिती मिळताच भुसावळ नियंत्रण कक्षाने नाशिकरोड रेल्वे स्थानक व लोहमार्ग पोलिसांना सतर्क केले. लगेचच बिटको रुग्णालयातील डॉ. नीलम तोरसकर, डॉ. तनुजा बागूल, डॉ. आदिनाथ सुडके, तसेच लोहमार्ग पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक सचिन बनकर, उपनिरीक्षक सोनवणे, हवालदार श्रीमती शिरसाठ आणि आरपीएफ निरीक्षक हरफूल सिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली जवान राज यादव व मनिष सिंग हे घटनास्थळी पोहोचले. महानगरी एक्सप्रेस नाशिकरोड स्थानकावर दाखल होताच वैद्यकीय पथक व पोलीसांनी जनरल डब्याजवळ धाव घेतली. गर्भवती महिलेला काळजीपूर्वक खाली उतरवून बिटको रुग्णालयात दाखल करण्यात आले तेथे त्यांनी कन्यारत्नास जन्म दिला. रेल्वे पोलिसांची, वैद्यकीय कर्मचाऱ्यांची तत्काळ भूमिका ही प्रशंसनीय असून, प्रवाशांनी त्यांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे.

### श्री दत्त मंदिर गो-सेवा संस्थानतर्फे चितेगाव फाटा येथे भूमिपूजन सोहळा संपन्न



**नाशिक ।** श्री दत्त मंदिर गो-सेवा संस्थानच्या वतीने चितेगाव फाटा साकारण्यात येणाऱ्या भव्य श्री दत्त मंदिर भूमिपूजन सोहळा मोठ्या मंगलमय वातावरणात पार पडला.

संस्थापक अध्यक्ष ज्योतिषविद्या वाचस्पती पुरुषोत्तम जोशी महाराज, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला संत-महंत उपस्थित होते. या प्रसंगी ब्रम्हलिन श्री श्री १०८ गुरुदेव पीर महंत योगी श्री गुरु बद्रीनाथजी महाराज, महंत योगी समशेरनाथजी (मठाधिपती पुणे), आचार्य महामंडलेश्वर प.पू. स्वामी संविदानंद सरस्वतीजी महाराज (अध्यक्ष, कैलास मठ ट्रस्ट, पंचवटी), पीर महंत लकीनाथजी महाराज (पंजाब) यांच्या प्रमुख उपस्थिती व त्यांच्या आशीर्वादाने श्री दत्त मंदिर भूमिपूजनाचा कार्या सुरुवात झाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे महंत आचार्य डॉ. अनिकेत शास्त्री महाराज (अखिल भारतीय संत समितीचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख), वेदाचार्य रवींद्र पैठणे गुरुजी ( अध्यक्ष महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान नाशिक), खासदार राजाभाऊ वाजे , आमदार दिलिप बनकर, माजी आमदार अनिल कदम, माजी आमदार योगेश घोलप, दत्ताजी (नाना) गायकवाड (चेअरमन दे. व्या. बँक), नगरसेवक उध्दव निमसे, पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज खेडलेकर, अतुलभाऊ धोंगडे, निशांत अवसकर, समाधान थोरात आदी उपस्थित होते. तसेच प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भूमीपूजन करून कुदळ मारण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी मनोगतात मंदिर निर्माणाबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी संयोजकांच्या वतीन संत मंहत व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समस्त श्री दत्त भक्त मंडळाचे शेखर जेठे, अदित्य राजपुत, प्रविण हिंगमिरे, संतोष प्रभाणे, रामदास जाधव, राजेश हिंगमिरे, मुकुंद जाधव, धनंजय सोनवणे, सोमनाथ भडांगे, अमोल धोंगडे, शिवा धोंगडे, अक्षय आहेर, स्वप्निल आहेर, महेंद्र पवार, संदिप महाले, संदिप दिडे, दशरथ दिंडे, अनिल रणाळकर, सिध्दार्थ नाठे, प्रतिक काळे, मिलिंद गंभीर, बंडु जाधव, रुही कांक्रीया, दिपक पाटील, वैभव थोरात, राजेंद्र गुळवे, कैलास टर्ले, नितीन पेखळे तसेच श्री दत्त भक्त मंडळ व समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सावित्रीबाईंच्या 'काव्य फुले'चे 'यशवाणी'वर सामूहिक वाचन





**नाशिक ।** मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' वेबरेडिओवर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लिखित कवितांवर आधारित 'काव्य फुले' हा सामूहिक काव्यवाचनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या कल्पक मार्गदर्शनानुसार हा पाचवा ऑनलाईन कार्यक्रम होता. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक व अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी प्रास्ताविकात सांगितले की क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समग्र काव्यरचनेचा आढावा घेता सध्या उपलब्ध असणाऱ्या त्यांच्या साहित्यात दोन काव्यसंग्रह आढळतात. त्यापैकी 'काव्यफुले' हा ४१ स्फुट कवितांनी सिद्ध आहे तर दुसरा 'बावन्नकशी सुबोधरत्नाकर' हा दीर्घ काव्यरचनेचा काव्यसंग्रह जोतीरावांचे काव्यमय चरित्रच असल्याचे ते म्हणाले. त्यांनी 'बाळास उपदेश' या कवितेने काव्यवाचनास सुरुवात केली. त्यानंतर श्रीमती मनिषा पाटील (शिकण्यासाठी जागे व्हा), श्रीमती रेणुका चव्हाण (जोतिबाचा बोध), डॉ. बाळासाहेब दिघे (माझी जन्मभूमी, पिवळा चाफा ) व डॉ. सुनिल भारोडकर (जाईचे फुल) यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विविध कवितांचे वाचन केले.

## बाळासाहेब ठाकरे क्रीडांगण उद्यानाचे विद्रूपीकरण; नागरिकांमध्ये संताप, सुशोभीकरणाची मागणी





**सिडको ।** शहरातील महत्त्वाच्या क्रीडांगणांपैकी एक असलेल्या स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडांगण उद्यानाचे सध्याचे विदारक रूप पाहून नागरिकांत मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त केली जात आहे. अनेक वर्षांपासून उद्यानातील भिंतींचे रंगरंगोटी न झाल्याने त्या पूर्णपणे काळ्या कुट्ट आणि घाण झालेल्या आहेत. तसेच, मुख्य प्रवेशद्वार हा कपड्यांच्या चिंध्यांनी बांधून ठेवलेला असून त्याचे दैन्यदर्शक चित्र दिसत आहे.

स्थानिक नागरिक आणि शिवसेना पदाधिकारी यांनी या संदर्भात नाशिक महापालिकेकडे तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली आहे. त्यांनी सांगितले की, "उद्यानाच्या भिंतींना कधीही रंगरंगोटी करण्यात आलेली नाही. इतकंच नव्हे, तर उद्यानातील गार्डन विभागात झाडांसाठी आवश्यक असलेली लाल मातीही उपलब्ध नाही." मेन गेटवर लावलेले स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव आचारसंहिता संपल्यानंतरही झाकून ठेवलेले आहे, जे अतिशय दुर्दैवी आहे. हे केवळ महापुरुषांचा अपमान नसून नागरिकांच्या भावनांनाही ठेच पोहोचवणारे आहे. त्यांनी महापालिकेला आवाहन केले की, लवकरात लवकर हे नाव उघड करून गौरवपूर्वक दाखवावे. उद्यानाच्या भिंतींवर सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक तसेच जनजागृती करणाऱ्या विषयांवर चित्रे आणि संदेश लिहिले गेले पाहिजेत. उदा. स्त्रीभ्रूण हत्या, व्यसनमुक्ती, लेक वाचवा लेक शिकवा, झाडे लावा झाडे जगवा, महापुरुषांचे विचार, संतांचे प्रेरणादायी संदेश आदी या चित्रांमुळे केवळ भिंतीच नव्हे, तर संपूर्ण परिसर सौंदर्यपूर्ण आणि प्रेरणादायी होईल. नाशिक शहरात आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहराचा चेहरा-मोहरा सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा परिस्थितीत या क्रीडांगणाचे देखील सौंदर्यीकरण करणे अत्यावश्यक आहे. हे ठिकाण फक्त खेळासाठी नसून, तेथून अनेक तरुण प्रेरणा घेतात. त्यामुळे त्या ठिकाणी सकारात्मक आणि संस्कारक्षम वातावरण निर्माण करणे काळाची गरज आहे. शिवसेना पदाधिकारी कैलास चुंभळे आणि त्यांचे मित्र परिवार यांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे नागरिकांच्या वतीने ही सर्व मागणी मांडली असून, लवकरात लवकर सुधारणा व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. "शहराच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असून, स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा सन्मान राखला जावा आणि उद्यानाचे नाव लौकिक मिळावा, हेच खरे उद्दिष्ट आहे," असे चुंभळे यांनी सांगितले.


# निरामय



[illegible]

डॉ. प्रसन्न नेने

[illegible]



[illegible]

डॉ. मेघा दळे


[illegible]



[illegible]

वेगळं काही...

[illegible]



[illegible]



डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

[illegible]

डॉ. कुंदन गायकवाड

[illegible]



[illegible]

डॉ. दत्तात्रय मुळे

[illegible]



